


ऑक्टोबर १९८२ ] विजयादशमी विशेषांक [ किंमत १ रु.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

डॉ.श्री.दि.परचुरे
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

श्री.सदानंद चेंदवणकर
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाई वाक्सुधा


वर्ष ६२ वे ) किंमत १ रुपया ( अंक ७

अक्टोबर १९८३

दूरध्वनी ८८२२५६१


## श्रीसाईबाबा पंचषष्टि महानिर्वाण विशेषांक


: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

जगा लावावे सत्पथी । हेंचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

जय जयाजी मूषक वहना ।
विघ्नकानन — निकृंतना ।
गिरिजानंदना मंगलवदना ।
अभिवंदना करितों मी ॥८॥

लाधो अविघ्न परिसमाप्ती ।
म्हणोनि हेंचि शिष्टाचारमुक्ती
इष्ट देवता — नमस्कृती ।
मंगलप्राप्त्यर्थ आदरिली ॥९॥

हा साईच गजानन गणपती ।
हा साईच घेऊनि परशूहाती ।
करोनि विघ्नविच्छिती ।
निज व्युत्पत्ति करू कां ॥१०॥

हाचि भालचंद्र गजानन ।
हाचि एकदंत गजकर्ण ।
हाचि विकट भग्नरदन ।
हा विघ्नकानन विच्छेदक ॥११॥

हे सर्व मंगल मांगल्या ।
लंबोदरा गणराया ।
अभेदरूपा साई सदया ।
निजसुख निलया नेईगा ॥१२॥

—श्री साईसच्चरित अध्याय १ ला

# सुवचन

न हि कश्चिद विजानाति किं कस्य श्वो भवेदिति ।
अतः श्वः करणीयानि कुर्यादद्यैव बुद्धिमान ।

जीवन हे क्षणभंगूर आहे. देहाचा भरवसा नसल्यामुळे करण्यास योग्य अशी कामे त्वरीत करावीत. उद्या कुणाचे काय होईल हे कोणी सांगू जाणू शकत नाहीं. म्हणूण बुद्धिमान मनुष्याने उद्या करावयाची कामे आजच करावीत.

संत कबीराने तर उद्याची कामे आज व आजची कामे आताच करावीत असे सांगितले आहे. —


**काल करैं सो आज कर, आज करैं सो अब, पल में परलै होयगी, बहुरि करेगा कब ॥**

# अनुक्रमणिका ऑक्टोबर १९८३


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | — | समाधीचा संदेश |
| २) ६५ वर्षांपूर्वीची शि. विजयादशमी | — | श्री. सदानंद चेंदवणकर |
| ३) महानिर्वाण | — | पंडित वि. तु. बोरगावकर |
| ४) श्री बाबांचा उपदेशपर बोध | — | सौ. सरोजिनी मुळ्ये. |
| ५) नित्य मी जिवंत जाणा हेंचि सत्य | — | श्री. सुरेश सातपुते |
| ६) श्री साई बाबांचे महानिर्वाण | — | सौ. उषाताई मुळे |
| ७) स्वर्गारोहण | — | श्री. पां. बा. भुतकर |
| ८) जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती | — | सौ. शोभना सोनवलकर |
| ९) श्रीसाई साक्षात्कारी दिव्यावतार | — | श्री रमाकांत पंडित |
| १०) श्रीसाईंच्या समाधीची पासष्ट वर्षे | — | श्री. वसंत वामन प्रधान |
| ११) बाबांचे दर्शन कोणत्या निमित्याने | — | श्री. माधव गोरे |
| १२) श्रीसाईबाबांचे महानिर्वाण | — | सौ. मंगला वैद्य |
| १३) श्रीसाईनाथा कोटी कोटी प्रणाम | — | श्री. गणपतराव सामंत |
| १४) श्रीबाबा आणि दक्षिणा | — | सौ. उषाताई अधिकारी |
| १५) श्रीसाईबाबांचा महानिर्वाण दिन | — | कु. सरल प. खारकर |
| १६) पुण्यस्मरण | — | श्री त्रिंबक द. चावक |
| १७) श्रीसाई शक | — | श्री. संतोष ठाकूर. |
| १८) साई अभंग | — | श्री. सुरेश रामधरणे |
| १९) महानिर्वाणा लोटली वर्षे ६५ | — | श्री. मधुकर अंबाडे |
| २०) साई, साई | — | सौ. विजया करंडे |
| २१) चिरयौवना समाधी | — | डॉ. सौ. मालती राहाटे |
| २२) साई भोले साई भोले | — | सौ. कमल इंगळे |
| २३) साई भूपाळी | — | श्री. दामोदर माने |
| २४) नांदी | — | श्री. ज्ञानेश्वर पाटील |

# समाधीचा संदेश

म. न. वि. वि.




'मी गेल्यावर माझी हाडे समाधीतून बोलतील, मुंग्यांची रीघ लागावी तशी माणसे शिरडीला येतील.' साईबाबांचे हे वचन आज अक्षरशः खरे झालेले दिसते. बाबा देहधारी होते तेव्हा त्यांनी अनेक प्रसंगी अनेक चमत्कार करून दाखविले, कुणी त्यांना जादुगार म्हणत नाहीं. त्यांची 'उदी' हीच त्यांची जादू.

साईबाबा आपल्या समाधीतून नवसाला पावतात, इष्ट साध्य करून देतात म्हणून शिरडीला अठरा पगड जातीची गर्दी लोटत असते. पानपट्टीच्या दुकाना-पासून ते थेट स्वयंप्रतिष्ठित व परप्रतिष्ठित लोकांच्या सदनाआंत साईबाबांच्या प्रतिमांनी, तसबिरींनी, अगदी स्वारी केलेली दिसते. १ नंबरी ब्राम्हणांच्या देवपूजेत साईबाबा आता मानाचे स्थान पटकावून बसले आहेत. गुरुवारचा हार, त्यांना घातलेला, जवळ जवळ घरोघरी दिसेल; आडरस्त्याला रहाणारे व आडमार्गाने वागणारे या समाधिस्त साईबाबांची पूजा करताना दिसतील. महंमद पैगंबराला किंचित विसरून धर्मवेडे मुसलमान शिरडीच्या यात्रेला जात असलेले आज दिसतात. हिंदूंच्या धर्मभोळेपणाबद्दल तर बोलायलाच नको. तेहतीस कोटी देवदेवतांचा काफिला अपुरा पडल्यामुळेच की काय, नव्या देव-तांची, बाबांची, बुवांची, महाराजांची त्यात प्रत्यही भर घातली जात आहे. श्रद्धाळू पुण्यवंतांची ही नवी जात आता निर्माण होत आहे. याला हिंदूंच्या अठरा पगड जातीचे एकोणिसावे पगडे म्हणायला हरकत कोणाची?

शिरडीला धावणारा भक्तगणांचा वर्ग निरपेक्ष नसून, कामनिक आहे ही गोष्ट नाकबूल करण्यात काही अर्थ नाहीं. चमत्कारावर पोसली जाणारी मनोवृत्ती खऱ्या परमार्थ पदावर नेणेच शक्य नाहीं जे केवळ स्वतःच्या स्वार्था-साठीच शिरडीची यात्रा करतात, अशांकरता परम अर्थ अथवा परमार्थपथ फार दूर दूर असा आहे. काहीं धनिकांच्या पैशाचा ओघ शिरडीकडे वहात असलेला हल्ली दिसतो व त्यामुळे नव्या सुखसोयी तिथे उत्पन्न होत आहेत. पण चालली आहे कुठे ही साई जनाची गाडी?

शिरडीला हिंदुपद्धतीची आरती धुपारती प्रत्यही तिन्ही त्रिकाळ होते तर हरएक दिनी मुसलमानी 'गलेप' (समाधीवरचे रंगीत वस्त्र) घातले जाते

हिंदु व मुसलमानी श्रद्धाळुपणाचा हा दिलासेवार सलोखा पाहिल्यावर हिंदु-मुस्लीम ऐक्याबद्दल येथे धास्ती वाटायचे कारण तरी काय?

साईबाबा मोगलाईतून शिरडीला आले व कर्मधर्म संयोगाने तिथेच स्थायिक झाले. परमार्थाचे ते पाईक परमेश्वराचे प्रकाशमय दूत. शिर्डीच्या रुक्ष माळ-रानावर त्यांनी आपला संन्याशाचा संसार थाटला; भूतजालीवरील आपल्या हृदयस्पर्श प्रेमाने तो नटविला. प्रत्यक्ष पशुपक्षी त्यांच्या भोजनात सामिल होत. चार घरे भीक मागून आणलेले गांवढ्या गावातले जेवण ते काय असणार? पण मोठ्या प्रेमाने साईबाबा ते खात असत. त्यांची प्रसिद्धि होण्यापूर्वी, त्यांचा महिमा लोकांना कळण्यापूर्वी तिथले लोक साईबाबांना एक पिसाट, वेडापिसा फकीर असे म्हणत. पण याच वेड्या फकिराने पुढे शहाण्यासुरत्यांना देखील वेड लावलं. 'साई साई' म्हणून ते त्याच्या भजनी लागले. काहीं भक्तांनी आपले तन–मन–धन, त्यांना अर्पण केले. गरीब बायांनी आपले सेवाधन त्यांच्या चरणी ओतले. भक्तिभावनेचे अनेक जिवंत झरे शिरडीच्या माळरानावर उफाळून वर आले व साईभक्तीची गंगा, गंगाभाई मशिदीतून उगम पावून आज दुथडी वहात आहे, व दक्षिणेत पोहोचून या गंगामाईचे पात्र तिथे आज फारच विस्तृत झाले आहे. जगाच्या उद्धाराकरताच संतांचे भूतलावर येणे होत असते. युगानुयुगे, हे चक्र असेच चालू आहे, कालमानाप्रमाणे देशाप्रमाणे, भावनेप्रमाणे नामरूप वेगळे इतकेच या सर्व महापुरुषांचे, मानवी अवतारांचे, अवलियांचे एकच ध्येय, एकच संदेश व एकच उद्देश आणि तो म्हटला की मानवता उन्नत करणे, दिव्यपदाला नेणे निरतिशय आनंदाची वाटेकरी करणे. साईबाबांनीही तेच कार्य केले व इ. स. १९१८ मध्ये ते अंतर्धान पावले त्यांनी ते हयात असताना (ते मृत नाहीतच) अनेक भक्तांचे त्यांनी मनोरथ पुरविले संत अमरच असतात व अदृश्यपणे माणसाच्या उन्नतीचे कार्य करीत असतात. त्या परम सत्तत्त्वाच्या चिदानंदाच्या, कार्यकारी मंडळाचे संत हे सभासद होत. साईबाबांची समाधी आज बोलून राहिली आहे. अनेक सकाम भक्तांना (सकाम भक्त हीन दर्जाचेच) दृष्टांत, साक्षात्कार, बढती, चलती अजूनही सुरू आहे, चालू आहे असे सांगतात. साईबाबांकरता या असल्या भक्तांनी काय केले आहे? हे असले भक्तजन कोणचे कार्य करून राहिले आहेत? स्वतःपलिकडे आहे का त्यांना दृष्टी? लोक-कल्याणाची कोणती नवी सृष्टी त्यांनी निर्माण केली आहे? नुसत्या साईबाबांच्या चमत्कारजन्य कथा फैलावून, त्यांचा संग्रह करून, त्या छापून त्यांचा प्रसार करता करता कोणते जनहित साधले जात आहे? साईबाबा हे बहुजन समाजाचे संत होते, धनिकही त्यांचे भक्त आहेत व पूर्वीही होते. हल्लीच्या भक्तजनात काही अमूलाग्र फरक झाला आहे का? देव ना मानता तुम्ही साईबाबांना? तर मग देव जर तुमची इच्छा पुरवतो तर या तुमच्या देवाची इच्छा —

साईबाबांची इच्छा तुम्ही कधी पुरवणार? का नुसत्या शिरडीच्या वाऱ्या करणार? साईबाबांची इच्छा तरी काय होती? जी सर्व संतांची इच्छा तीच साईबाबांची; दुसरी काय असणार? पाण्याचं तेल करून ज्यांनी पणत्या लावल्या दीपज्योती पेटवल्या, लोकांच्या हृदयात भक्तिभावाच्या काडवाती लावल्या, त्या समाधिस्त साईबाबांचे उतराई कसे होणार आहात तुम्ही? शिरडीच्या रुक्ष प्रदेशात ज्यांनी आपल्या जीवनाने आपपरभाव विसरून, भक्तिभावाचे नंदनवन उत्पन्न केले, कडव्या व धर्मवेड्या मुसलमानांना हिंदूंशी भावाप्रमाणे वागायला लावले, त्या साईबाबांची स्मृती तेवत ठेवणे हे आमचे परमकर्तव्य आहे.

स्वतःला विसरल्याशिवाय संतपण नाही- आणि तसे घडल्याशिवाय कुणाला भक्तही पण होता येत नाही भक्तीची लेबलं स्वतःला चिकवटवून, भक्त बाळपणाचा तो हा असा बाजार मांडून, आजवर कधी कुणाचा उद्धार झाला नाहीं, उद्याही होण्याची आशा दिसत नाहीं. साईबाबा शिर्डीसारख्या कुग्रामात राहिले व तिथं त्यांनी आपले जीवनकार्य केले व ते ६५ वर्षांपूर्वी संपवून त्यांनी आपली अवतार समाप्ती केली. मोगलाईसारखा त्यावेळचा सुपीक प्रदेश सोडून, कंगाल नगर जिल्ह्यातील एक 'नापिक व निपाणी' गाव त्यांनी आपल्या सेवेचे क्षेत्र निवडले. पण हल्लीच्या त्यांच्या भक्तांचे सेवाक्षेत्र कुठे आहे? ते कुणाची तरी निरपेक्ष अशी सेवा करतात का? शहरापलीकडे ते गेले आहेत का रहायला? ज्यांना शहरातही यांत्रिक सुखाच्या परी (पर्याय) करून करमेनासे झाले आहे अशी मंडळी खेडोपाडी जाऊन कोणचे दिवे लावणार? साईबाबांनी पाण्याने पंत्या पेटवल्या ही नवलकथा किती दिवस सांगत बसणार? रक्ताचे पाणी करून, काबाडकष्ट करायला, राबायला, जोवर आपण तयार होणार नाही तोवर कुठलाही संत आपला उद्धार करू शकणार नाही आणि माणसाची दैन्यावस्था दूर होणार नाही. माणसामाणसातले नाते सुधारल्याशिवाय, खरा बंधुभाव प्रेमभाव जागृत झाल्याशिवाय, दैनंदिन जीवनात तो आचरणात आणल्याशिवाय शिरडीची वाटचाल केवळ निरर्थक होय. साईमहाराजांच्या तसबिरीपुढे दर शुक्रवारी उदी जाळण्यापेक्षा माणूस प्रत्येकवारी आपला अहंकार जाळू लागेल, स्वतःच्या मोपणाला मूठमाती देईल तर स्वर्गस्थ साईंच्या महान् आत्म्याला आपल्या छोट्या भक्ताचा अभिमान वाटेल खास! पण या असल्या वाटेला जातो आहे कोण? प्रतिष्ठितपणा सांभाळून शिरडी, साकोरी, पंढरी इत्यादि वाऱ्या केल्या म्हणजे झाले. अनेक बुवांचे अनेक भक्त वेगवेगळे तंबू ठोकून प्रदर्शन भरवून राहिले आहेत. गुरुजींची संस्था तर टायफॉइडच्या साथीप्रमाणे प्रसार पावू लागली आहे!'

साईपंथ हा काही कानफाट्या साधूंचा पंथ नव्हे. साईजी स्वतः योगी, आत्मज्ञानसंपन्न असेच होते; पण त्यांनी ज्ञानमार्गाचा अगर कर्ममार्गाचा तात्विक

प्रसार अगर प्रत्यक्ष प्रचार केलेला नाहीं. नवे ग्रंथ लिहिले नाहीत. जीवन हाच त्यांचा ग्रंथ व त्यावर आचरणाची सुवर्णाक्षरे अनंतकालाकरता त्यांनी कोरून ठेवली आहेत हा शिलालेख समजून घेणे, उमजून घेणे, आचरणी उतरविणे हेच साईभक्तांचे परम कर्तव्य आहे.

माणूस गेल्यावर त्याचं मोल कळत पण योग्य मूल्य न झाले तर साईभक्त म्हणविणारांना त्यांच्या जीवनाचे रहस्य समजले आहे का? निर्दय मनुष्य साईचा भक्त होऊ शकत नाही. प्राणीमात्रांवर दया करणं हाच सनातन धर्म, साईबाबांनी आपल्या निवडलेल्या लहानशा क्षेत्रात आचरण करून दाखविला. आमरणात लोकांवर त्यांनी दयाच केली. धर्माचे मूळ दयाच ना? दुसऱ्यांचे दुःख ते आपलेच दुःख असे मानून ते निवारण करण्याकरता यथाशक्ति झटणं, राबणं हेच साईबाबांनी केलं. भक्त त्यांना काहीही समजतात ते स्वतःला देव मानीत नसत. अनेक देवमाणसे त्यांच्या सहवासात त्यांना अनन्यशरण गेल्याने परसुखात समरस झाल्याने, परदुःखाने वितळल्यामुळे उद्धरून गेली.

'चमत्काराशिवाय, नमस्कार नाही' ही सर्वसाधारण माणसाची खोड साईसारख्या सत्पुरुषाला ठाऊक होती. आणि म्हणून त्यांनी वेळोवेळी चमत्कार दर्शनाचे प्रयोग केले. तसे केल्याशिवाय मामुली माणसाला त्यांचा मोठेपणा कळलाच नसता. सिद्धी त्यांना प्राप्त होत्या; त्यांचा दुरुपयोग त्यांनी कधी केला नाही. स्वतःच्या सुखसमृद्धीसाठी त्यांनी कधीही आपली सिद्ध—शक्ती वापरली नाही अशाच सत्पुरुषाला, सिद्ध वा साक्षात्कारी म्हणतात. अरुणाचलमचे श्री भगवान रमण महर्षी, पॉंडिचरीचे अरविंद घोष या महापुरुषांप्रमाणेच साईबाबा आपले स्थान सोडून कोठे दूर गेले नाहीत. एकाच ठिकाणी राहून, लोकांना सेवेचा भक्तिमार्ग दाखवून, भक्तियुक्त सेवा सोदाहरण समजावून देऊन साईबाबांनी १९१८ पर्यंत तपाचरण केले.

साईबाबांनी ख्रिस्त देवांप्रमाणे गिरिप्रवचन दिले नाही, बुद्ध देवांप्रमाणे ठिकठिकाणी जाऊन आपली अमृतवाणी ऐकविली नाहीं अगर शंकराचार्यांप्रमाणे अद्वैत—सागराचे अलौकिक दोहन करून मठस्थापनाही पण केली नाहीं.

भटक्या गोसाव्या बैराग्यांप्रमाणे साईबाबा कधी हिंडले नाहीत. आपला सारा संसार त्यांनी द्वारकामाई मशिदीत मांडला. रमण महर्षींच्या अरुणाचलम् या पर्वताचा जो संदेश तोच साईबाबांच्या शिर्डीच्या समाधीचा. तो संदेश ज्यांना समजून घ्यायचा असेल, त्याने सारे धर्म सारख्या योग्यतेचे मानले पाहिजेत; आपपर भाव विसरला पाहिजे. परदुःख विमोचन, म्हणजेच परोपकार

हे आपल्या जीवनाचे ध्येय ठरविले पाहिजे – नव्हे तोच प्रधान हेतू मानला पाहिजे.

'परदुःख दर्शनाशिवाय डोळ्यातल्या गंगायमुनांना पाझर फुटणार नाहीं आणि मग मात्र त्यांचा प्रवाह गिरिनिर्झराप्रमाणे वाहो!' इतके तुमचे हृदय कोमल झाले पाहिजे. पत्तराप्रमाणे कठीण अंतःकरण असतांना सत्पुरुषाच्या स्मृतीची सेवा कोण आणि कशी करणार? साईबाबा स्वतःसाठी जगलेही नाहीत आणि मेलेहीपण नाहीत – एका भक्तांचे मरण त्यांनी स्वतःवर ओढवून घेतले व त्याला जगविले. यमधर्मराजाला चकविले; नगास नग देऊन सृष्टीचा नियम पाळला. या आख्यायिकेवर का विश्वास ठेवू नये? मोगल बादशहा बाबर याने आपल्या मरणोन्मुख मुलाला स्वतःचे आयुष्य बहाल करून त्याचे मरण स्वीकारले होते, असा ऐतिहासिक दाखला मिळतो ना? झाले तर मग; चमत्कारांना नुसती नाके मुरडून काही काम भागणार नाहीं. भक्तांसाठी मरण स्वीकारून साईबाबांसारखे सत्पुरुष तर अमर झालेच आहेत. त्यांच्या समाधीभोवती गोळा होणारांनी त्यांची निरतिशय दया, अहंकारशून्यता, आपपरभाव विसर्जन, परधर्माबद्दल सहिष्णुता, हा दिव्य संदेश जर मिळविला नाही, तो आत्मसात केला नाहीं, स्वतःच्या आचरणात उतरविला नाहीं, तर आज बेफाम वहाणाऱ्या, चमत्कारलोलूप, स्वार्थी, आंधळ्या साईभक्तीचा काही एक उपयोग नाहीं.

हाच बाबांच्या समाधीचा संदेश त्यांच्या ६५ व्या पुण्यतिथी निमित्त द्यावासा वाटतो. ☆

## श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी

पांसष्टावा पुण्यतिथि सोहळा

सद्गुरुसार्वभौम भगवान श्रीसाईबाबांचा ६५ वा पुण्यतिथी महोत्सव शनिवार दिनांक १५–१०–८३ ते मंगळवार दिनांक १८–१०–८३ पर्यंत शिरडी क्षेत्री साजरा होत आहे. तरी सर्व साईभक्तांनी हेच आग्रहाचे निमंत्रण समजून चार दिवसांच्या भरगच्च कार्यक्रमास हजर राहून सर्व कार्यक्रमांना संपूर्णपणे सहकार्य द्यावे अशी विनंती श्री. क. हि. काकरे न्यायालयधारक श्रीसाईबाबा संस्थान शिरडी हे करतात. संस्थानच्या दादर येथील श्रीसाईनिकेतन या कार्यालयातही मंगळवार दिनांक १८ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वा. आरती होईल.

# ६५ वर्षांपूर्वीची शिरडीतील विजयादशमी

० आपले अवतारकार्य समाप्त झाल्यानंतर अवतारी पुरुष निजस्वरूपात विलीन होऊन जातात. त्याप्रमाणे बाबांचे अवतारकार्य संपताच त्यांनी पण आपल्या महासमाधीचे प्रस्थान ठेवले. 'अनायासेन मरणं विना दैन्येन जीवनम्' हे या जगातील मानवाच्या उत्कृष्ट गृहस्थाश्रमाचे लक्षण सांगितले जाते. बाबांना स्वतःचा व्यक्तिगत संसार नव्हता. पण त्यांना जनार्दन ज्या जनात दिसत होता, त्या जनांच्या संसाराची काळजी ते वाहातच होते. पण त्या संसारातही त्यांना कधी दैन्य नव्हते. दक्षिणामिषाने संपत्ती त्यांच्या पायापुढे चालत येत असे आणि ते तिची रवानगी तितक्याच उत्कटतेने रंजल्या-गांजलेल्यांकडे व अनाथ अपंगांकडे करीत असत. तेव्हां त्यांचे देहावसानही अनायासेनच झाले. आपल्या समाधि-मंदिराची त्यांनी आपल्या हाताने भक्तांकडून सिद्धता करवून घेतली होती. सारे भक्तयोग पुरविल्यावर बाबांना या जगात कोणतेच कर्तव्य उरले नव्हते; म्हणून ही देहस्थिती सोडताना त्यांना कोणत्याच प्रकारचा विषाद वाटला नाही.

श्रीसाईबाबा शिरडीत आल्यापासून त्यांच्याजवळ एक मातीची पक्की भाजलेली वीट होती. ते तिची अत्यंत काळजी घेत असत व ती रोज उशा-कडे घेऊन झोपत असत. ते मशिदीत आले, तेव्हां कै. म्हाळसापती व काशिराम शिंपी तिला स्नान घालीत असत. तिची षोडशोपचारे पूजा करीत व ती वीट जपून धुनीच्या खांबाजवळ ठेवीत. रात्री तिला कपड्यात गुंडाळून बाबा उशाला घेत.

पुढे बाबांचा एक सेवक-भक्त महादू कान्हू फासले मशिदीचे काम करू लागला. तो पण ती वीट अत्यंत काळजीपूर्वक धुऊन श्रीधुनीमाईचा खांब व बाबांच्या कपड्याच्या पेटीच्या खाली असलेली सिमेंटची बैठक यामधील लहानशा फटीत ठेवित असे व रात्री कपड्यात गुंडाळून बाबांच्या उशाकडे ठेवी. बाबांचे त्या विटेवर फार फार प्रेम असे. ते तिला कधीही विसंबत नसत. ती वीट त्यांचा जीव की प्राण असे.

एक दिवस ती कुणाच्या तरी हातून फुटली व तिचे दोन तुकडे झाले. ही गोष्ट बाबांना कळल्यावर त्यांना अतिशय वाईट वाटले. ते अक्षरशः कळवळले. त्यांनी आपले स्वतःचे थोबाड झोडून घेतले. त्यांच्या नेत्रात अश्रू उभे राहिले. ते रडू लागले व म्हणाले,

"माझी संगतीण गेली. मी आता रहाणार नाही."

आणि खरोखरीच तसे झाले. वीट दुभंगल्यापासून आठवड्यातच त्यांनी महासमाधी घेतली.

बाबांना मानमोडी हा विकार झाला होता. त्यांना ताप येत होता. त्यांनी अन्न वर्ज्य केले होते. त्यामुळे दिवसेंदिवस त्यांच्या शरीरात शक्ती मुळीच

राहिली नव्हती. त्यांना जेव्हा ताप आला होता, तेव्हा काकासाहेब दीक्षित शिरडीस होते. परंतु बाबांनी त्यांना मुंबईस पाठवून दिले.

साधारणपणे सर्व धर्माच्या पद्धतीप्रमाणे एखाद्याचा अंतसमय जवळ आला, म्हणजे त्याच्याजवळ प्रार्थना किंवा धर्मग्रंथ वाचण्याची प्रथा आहे. साईबाबांना आपला अंतकाळ जवळ आल्याची पूर्ण जाणीव झाली होती, म्हणूनच की काय बाबांनी शेवटच्या तीन दिवसात वझे नावाच्या एका सच्छील भक्त ब्राम्हणाला 'रामविजय रामायण' वाचण्यास सांगितले. कारण बाबा हे प्रभू श्रीरामचंद्रांचे एकनिष्ठ भक्त होते. या रामविजय ग्रंथाचे एकदा वाचन झाल्यावर बाबांनी वझेकडून पुन्हा पुन्हा तीन चार वेळा रामायणाचे–रामविजयाचे पारायण करवून घेतले.

शेवटचे तीन–चार दिवस तर त्यांनी आपले उठणे बसणे हिंडणे-फिरणे हे सारे शारीरिक व्यवहार बंद करून टाकले.

पण अगदी अखेरच्या क्षणापर्यंत पूर्णपणे शुद्धीवर चांगल्या सावधस्थितीत सर्वांच्याबरोबर ते बोलत होते व आपल्या भक्तांना शोक करू नका, धीर सोडू नका, असा उपदेश करीत होते. त्यामुळे पुढे लौकरच आपल्यावर वज्राघात होणार आहे याची कुणालाच कल्पना नव्हती, जाणीव नव्हती.

मंगळवार ता. १५ ऑक्टोबर १९१८ चा दिवस नेहमीप्रमाणे उगवला. दुपारच्या आरतीनंतर बाबांनी बापूसाहेब बुट्टी, जोग, नानासाहेब निमोणकर माधवराव देशपांडे इ. मंडळींना घरोघर जेवावयास पाठवून दिले. ही सारी मंडळी बाबांच्या बरोबर मशिदीत जेवत असत. पण त्या दिवशी त्यांना अशा प्रकारे घरोघर पाठवून बाबांनी या १५–१०–१९१८ रोजी विजयादशमीच्या दिवशी दुपारी २ वाजून ३५ मिनिटांनी महानिर्वाण केले.

बाबांची अगदी निकटची मंडळी बाबांच्या जवळ होती.

लक्ष्मीबाई शिंदेला त्यांनी नऊ रुपये दक्षिणा काढून दिली. ती संतुष्ट झाली. ती रोज रात्री भाकर देत असे.

श्यामा उर्फ माधवराव देशपांडे द्वारकामाईत पायरी जवळच बसले होते. त्यास बाबा म्हणाले,

"श्यामा! मला आता बरे वाटत नाही. बुट्टीच्या दगडी वाड्यात आता मला घेऊन चला."

असे क्षीण आवाजात बाबा म्हणाले आणि तेच भगवान श्रीसाईबाबांचे अंतिम उद्‌गार होत.

बयाजी अप्पा कोते पाटील या नावाचा बाबांचा एक निःस्सीम सेवक-भक्त बाबांच्या जवळ त्यावेळी होता. त्याच्या मांडीवर बाबांनी डोके टेकले व अखेरचा श्वास टाकला. बाबांच्या या अंतिम घडीचे वर्णन करताना श्री साईसच्चरित्रकार म्हणतात —

आयुर्दाय स्नेह सरता । प्राणज्योती मंद होता ।। बयाजीचे अंकावरता । देह विश्रामता पावला ।। नाहीं पडून वा निजून । स्वस्थपणे गादीसी बैसून । ऐसा स्वहस्ते धर्म करून । केले विसर्जन देहाचे ।।

बाबांची अंतिम क्षणाची हालचाल चालू असताना भागोजीचे त्यांचे-कडे बारकाईने लक्ष होते. त्याने लगेच नानासाहेब निमोणकरांना हाक मारली. नानांनी लगेच बाबांच्या मुखात गंगोदक घातले आणि सर्वांनी "देवा देवा" असा हंबरडा फोडला. 'देवा देवा' असा पहिला पुकारा जेव्हा भक्त मंडळींनी केला, तेव्हां बाबांनी 'आ' म्हणून होकार दिला व मगच प्रयाण केले.

इकडे केवळ बाबांच्या आग्रहाखातर जी मंडळी जेवायला गेली होती, त्यांचे जेवणाकडे लक्षच नव्हते. ते कसेबसे पोटात अन्न कोंबीत होते. तोच निरोप आला, की भेटीला चला. आपल्या सबंध दुखण्यात बाबा द्वारकामाईत बसूनच असत व बसलेल्या अवस्थेतच त्यांचे देहावसान झाले.

भोजनाला गेलेल्या मंडळींना निरोप मिळताच ती धावत आली आणि बघतात तर काय सारेच काही शून्य. सगळा कारभार आटोपलेला होता. परमप्रिय पंचप्राणप्रिय बाबाजी पंचत्वात विलीन झाले होते. ते सर्वांना सोडून गेले होते.

भगवान श्रीसाईबाबांची दुःखद वार्ता वाऱ्यासारखी चारी दिशांना पसरली. सर्वत्र एकच हाहाकार झाला. शिरडी गावातील सारी लहानथोर आबालवृद्ध स्त्री–पुरुष मंडळी आकांत करीत द्वारकामाईत धावली. आजूबाजूचे सर्व लोक अक्षरशः धावत धावत आले. सर्वत्र हाहाःकार उडाला. सारेचजण दुःखाने हळहळून आक्रोश करू लागले.

"बाबा गेले! बाबा आम्हांला सोडून गेले हो!"

शिरडीतील घरोघरी मोठी गडबड उडून गेली. सर्वांच्या उरात धडधड सुरू होऊन सगळे जग बाबांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी धावून आले.

द्वारकामाई मंडप तर गच्च भरून गेला. बाबांचा पार्थिव देह पाहून सर्वांचे कंठ दाटून आले.

श्रीसाईंचे महानिर्वाण होण्याच्या अगोदर म्हणजे शके १८३८ च्या विजया-दशमीची गोष्ट. त्या दिवशी संध्याकाळी सूर्यास्ताच्या सुमारास बाबांनी एका-एकी जमदग्नीचे रूप प्रगट केले. अंगातली कफनी आणि डोईचे फडके काढून ते धुनीत टाकले. लंगोट होता तो पण फेडला व त्याचीही अग्नीला आहुती दिली आणि दिगंबर होऊन ते म्हणाले,

"करा रे आता निदान । मी मुसलमान, की हिंदू।।"

ज्या कुणाला शंका असेल ती त्याने आताच फेडून घ्यावी, असे ते मोठ-मोठ्याने ओरडून सांगू लागले. हा देखावा पाहून सगळेजण गडबडले होते. तो दिवस त्यांचा चावडीवर झोपण्यास जाण्याचा होता. वाजत-गाजत त्यांची मिरवणूक जाणार होती, पण पाहातात तो हे काय?

रक्तपिती झालेला भागोजी शिंदे नावाचा एक व्याधिष्ठ भक्त त्यांच्या-जवळ नेहमी असे, तो धीर करून पुढे झाला व त्याने विचारले,

"महाराज आज शिलंगणाचा दिवस आणि हे काय?"

"बाबा म्हणाले,

"हेच माझे शिलंगण"

आणि असे म्हणून त्यांनी आपला सटका घेऊन सणसण जमिनीवर हाणला. अशा परिस्थितीत तीन–चार तास गेले. रात्री बारा वाजले तेव्हा कुठे स्वारी शांत झाली. नवाकोरा लंगोट ते नेसले, नवी कफनीही त्यांनी परिधान केली, डोक्यालाही एक शुभ्र फडके बांधले व नंतर नेहमीप्रमाणे मिरवणुकीने ते चावडी वर गेले.

या घटनेने त्यांनी असे सूचित केले, असे म्हणतात की भवसागर सीमो-ल्लंघनास दसरा हाच चांगला मुहूर्त होय.

या घटनेनंतर मधे एकच वर्ष गेले व दुसऱ्या वर्षी दसऱ्याच्याच दिवशी बाबांनी अशा प्रकारे देह ठेवला. या घटनेची आठवण शिरडीकरांना झाली. अशा प्रकारच्या बाबांच्या आठवणी याप्रसंगी जो तो सांगू लागला.

१९१८ सालची विजयादशमी हा आपल्या प्रयाणाचा मुहूर्त म्हणून बाबांनी ठरविला होता, असे आणखीन एका गोष्टीवरून दिसून येते. शिरडीचे ग्राम पाटील रामचंद्र दादा हे एकदा खूप आजारी पडले. त्यांचे दुखणे खूप जोरावले. वेदना असह्य झाल्या. अशा स्थितीत एका मध्यरात्री त्यांना आपल्या उशाशी साईबाबांची मूर्ति दिसली. पाटील दीनवाणीने बाबांना उद्देशून म्हणाले,

"बाबा, आता मला हे दुखणे नाही हो सोसवत मरण केव्हां भेटेल याची मी वाट पाहातो आहे."

त्यावर बाबा अत्यंत दयार्द्र स्वरात म्हणाले,

"अरे, तू काही काळजी करू नकोस. तुझ्यावरचे गंडांतर टळले. तुला काही भीती नाही, परंतु तात्याची (तात्या गणपत पाटील कोते) मला मात्र धडगत दिसत नाही; शके १८४० च्या विजयादशमीला (सन १९१८) तात्या अक्षयपद पावणार खास. पण हे त्याला सांगू नकोस. उगीच तो मनाशी झुरत राहिल."

त्या दिवसापासून रामचंद्र पाटील बरा होत गेला. बाबांनी सांगितलेली भविष्यवाणी त्याने फक्त बाळा शिंप्याच्या कानावर घातली होती. आणखीन कोणाकडे तो बोलला नव्हता.

शके १८४० चा भाद्रपद सरला आणि खरोखरच तात्याबाने बिछाना धरला आणि आता आश्विन मास डोकावू लागण्याच्या आधी बाबांनाही शिरशिरी भरली, तात्याबाला दुखण्याच्या यातना फार होत. पण त्याचे चित्त सदैव बाबांच्या स्मरणात गुंतलेले असे. इकडे बाबांचे दुखणे वाढले. दसरा

जवळ आला, तसा रामचंद्र पाटील व बाळा शिंपी यांना भयाने घाम सुटला. दसऱ्याला तात्याची नाडी अगदी मंद झाली. भान पण गेले ...

पण नवल असे, की इकडे त्याच दिवशी बाबांनी देह ठेवला आणि तात्या आजारातून वाचून हळूहळू बरा झाला. या घटनेसंबंधी साईसच्चरित्रकार लिहितात :

**असें–पुढें नवल वर्तले । तात्याचेंहि गंडांतर टळले ।**
**तात्या राहिले, बाबाच गेले । जणू मोबदला केले की ॥**
**पाहा आता बाबांची वाणी । नांव दिधले तात्याचे लावुनी ।**
**केली तयारी निजप्रयाणी । वेळा न चुकवुनी अणुभरा ॥**

तेव्हां सांगावयाची गोष्ट, अशी की बाबांनी आपल्या महासमाधीची वेळ अगोदरच ठरवून ठेवली होती, हे निश्चित.

श्रीबाबांच्या देहावसानाने कष्टी दुःखी झालेल्या साईभक्तांचा पहिला दुःखावेग ओसरल्यावर आता बाबांच्या देहाचे काय करावे, हा विचार सुरू झाला. बुट्टींच्या वाड्याच्या चौकात ठेवावे, असे बाबांचे पूर्वीचे सांगणे होते; पण आता मुसलमान भक्त म्हणू लागले, ते मुसलमानांच्या कबरस्तानात नेऊन पुरू या. पण तिथले ग्रामपाटील श्री. रामचंद्रदादा हे मोठे करारी होते. ते म्हणाले,

**असोत तुमचे विचार काही । समूळ काही आम्हां ते मान्य नाही ।**
**वाड्याबाहेर इतरां ठायी । क्षणभरही साई ठेवू नये ॥**

आणि मग सारेजण गप्प बसले. तरीपण दोन दिवस भयंकर वादावादी झाली, तेव्हां काकासाहेब दीक्षितांनी कलेक्टरसाहेबांना तार पाठवून त्यांची मदत घेतली. त्यांनी सोने नावाच्या मामलेदाराकडे हा निवाडा करण्याचे काम सोपविले. त्याने लोकांची मते घेतली, ती हिंदूंच्या बाजूने अधिक पडली व शेवटी बाबांचा देह बुट्टींच्या वाड्यात समाधीसाठी नेण्याचे ठरले; व वादावादी थांबली.

श्रीसाईबाबांची समाधी ही बाबांनी निर्वाणापूर्वीच बांधवून घेतली होती. नागपूरचे प्रसिद्ध साईभक्त श्रीमंत गोपाळराव उर्फ भाऊसाहेब बुट्टी यांच्या मनात शिरडीला आपल्या मालकीचा स्वतंत्र वाडा असावा, असे आले. बाबांनी त्यांना स्वप्नात येऊन वाडा आणि देऊळ दोन्ही उभारा, अशी आज्ञा केली होती. त्याप्रमाणे वाडा उभा झाला. बाबांनी बांधकाम मंजूर केले होते. या वाड्याच्या गाभाऱ्यात श्रीमुरलीधराची मूर्ति एका चौकावर सिंहासन करून बसवावी, असे त्यांच्या मनात होते. त्यालाही बाबांची अनुमती मिळाली होती. पण त्याचवेळी बाबा म्हणाले होते,

देऊळ पूर्ण झालियावरी । येऊ की वस्तीस आपणही ॥

तसेच ते असेही म्हणाले होते –

वाडा पुरा झालिया पाठी । आपुलेसाठीच तो लावू ॥

आणि काय चमत्कार ही कामे पूर्ण होत असतानाच बाबांनी इहलोकाचा त्याग केला व त्यांनी सांगितल्या प्रमाणेच त्यांचे परमपवित्र असे शरीर वाड्याच्या गाभाऱ्यात ठेवण्यात आले. साईसच्चरित्रकार म्हणतात :

मग ते पवित्र साई शरीर । जाहले गाभारियामाजी स्थिर ॥
वाडा जाहला समाधिमंदिर । अगाध चरित्र साईचे ॥

श्रीबाबांच्या देहाला भूमातेच्या उदरीच का स्थान देण्यात आले, अग्निसंस्कार का करण्यात आला नाही, याचे कारण तर हिंदू पद्धतीत संन्याशांना अशी समाधीच देत असतात. बाबा लौकिक संस्कारांच्या पलिकडचे असल्यामुळे वाच्यार्थाने संन्याशी नव्हते हे खरे, तथापि रूढार्थाने ते खरे संन्यस्त होते आणि दुसरे कारण असे, की त्यांच्या भक्तांत त्यावेळी हिंदूप्रमाणे मुसलमान भक्तही बरेच होते, तेव्हा त्यांच्या पद्धतीप्रमाणे त्यांचा देह भूमिगत केल्याने त्या जमातीलासुद्धा थोडे बरे वाटावे.

बाबा महासमाधीस्थ झाल्यावर त्यांच्या पार्थिव देहावर फुलांच्या राशीच्या राशी पडल्या. हजारो लोक 'साईबाबा' असे म्हणत आक्रोशत होते. तो सारा प्रसंग हृदयाला पीळ पाडणारा होता.

– आणि अगदी याच वेळी शिरडीत मुसळधार पाऊस सुरू झाला. एका महान संताचे स्वर्गात स्वागत करण्यासाठी जणू आकाशात गडगडाट झाला; व विजा चमकू लागल्या. दुःखावेग आवरून लोक घरोघरी परतले.

हिंदुपद्धतीप्रमाणे बरोबर तेराव्या दिवशी श्रीबाबांचे उत्तरविधान (श्राद्ध) करण्यात आले, तिलांजली, पिंडप्रदान, मासिक श्राद्ध इत्यादी विधी यथाशास्त्र सामिश्र ब्राम्हणांच्या सहकार्याने करण्यात आला. हा सगळा कार्यक्रम यथोचित असा साकोरीच्या श्री उपासनी महाराजांच्या उपस्थितीत पार पडला. ब्राम्हणभोजन, अन्नसंतर्पण, दक्षिणाप्रदान इत्यादीसाठी शेकडो रुपये भक्तांनी खर्च केले. मुंबईतील विलेपार्ले येथल्या श्री. शामराव जयकर यांनी बाबांच्या हयातीत बाबांना विनंती करून आपल्या सफाईदार कुंचल्यातून उतरवलेली बाबांची छानदार प्रतिमा बाबा द्वारकामाईत जिथे कठड्यावर हात टेकून बसत असत, तिथे स्थानापन्न करण्यात आली. ती पाहून साई प्रत्यक्ष इथेच आहेत अशी भावना होते.

जाहली साईदेह निवृत्ति । प्रतिमा-दर्शने होय अनुवृत्ति ॥
वाटे निजभक्त भावार्थी । पुनरावृत्ति ही मूर्त ॥

श्रीसाईमहाराज निर्वाण पावले किंवा अदृश्य झाले, तरी पूर्वीचे दत्तावतार श्रीनृसिंहसरस्वतीस्वामी गाणगापुरादी स्थानी आणि श्रीअक्कलकोटस्वामी अक्कलकोटी किंवा रामदास तुकारामादी संत त्यांच्या निर्वाणस्थळी गुप्तरूपाने वास करीत असतात, ही जशी अनेकांची श्रद्धा आहे, तशीच बाबा शिरडीत गुप्तरूपाने वास्तव्य करून आहेत, अशी बाबांच्या भक्तांचीही गाढ श्रद्धा आहे. श्रीसाईबाबा गुप्तरूपाने आजसुद्धा शिरडीतच आहेत व एकनिष्ठ भक्तांचे मनोरथ ते पूर्वीप्रमाणेच पुरे करीत असतात.

श्रीरामदासस्वामींनी मृत्युनिरूपण करताना महान वीर, योद्धे, मुत्सद्दी, राजेमहाराजे, पंडित, शास्त्रज्ञ इत्यादी सर्व हे जग सोडून जातात. मृत्यु कुणाचीही गय करीत नाही. फक्त एकच राहतात, ते कोण? तर स्वरूपाकार झालेले संत. कारण त्यांनी ज्ञानयुक्त होऊन मृत्युला जिंकलेले असते असे म्हटले आहे.

सामान्य लोकांच्या बाबतीत मृत्युनंतर व्यक्तीचा लिंगदेह काही काळ तरी अंतराळात वावरत असतो आणि तो आप्तेष्टांना व प्रेमीजनांना मधून मधून भेट देतो, असे त्या शास्त्रातले तज्ज्ञ सांगतात, आणि अनेकांच्या ते अनुभवासही येत असते. श्रीसाईबाबांसारख्या संतांच्या किंवा अवलियांच्या बाबतीत हाच नियम लावला, म्हणजे त्यांच्या प्रयाणानंतरही काही काळ-तरी त्यांचा लिंगदेह त्यांच्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण करीत असतो, असे मानण्यास हरकत नाही. या दृष्टीने बाबांच्या प्रयाणानंतर त्यांचे नामस्मरण किंवा समाधिपूजन दर्शन इ. गोष्टी त्यांच्यावर एकनिष्ठ श्रद्धा ठेवणाऱ्या भक्तांना लाभदायक ठरलेल्या आहेत. असे जे त्यांच्या चरित्रात सांगितले आहे त्यावर विश्वास ठेवण्याला मुळीच हरकत नाही. श्रीसाई समर्थ रामदास-स्वामी यांच्यानंतर अवघ्या दोन शतकाच्या आतच सच्चिदानंद विश्वंभर श्रीअवधूत दत्तात्रेयांनी श्रीसद्गुरु साईबाबांच्या रूपाने या भूमीवर पुन्हा अवतार घेतला व १८३८ पासून १९१८ पर्यंतच्या ८० वर्षांच्या कालखंडात हिंदुमुसलमानांना सन्मार्गाला लावण्याचा यत्न केला. खरोखरच श्रीसाईबाबा हे महान पुरुष होऊन गेले.

श्रीसाईबाबांचे महानिर्वाण झाले त्या दिवशी रात्री मुंबईचे प्रसिद्ध साई-भक्त श्री. हनुमान प्रसाद जोशी यांच्या घरातील बाबांची तसबीर एकाएकी गदगदा हलू लागली. पार्ल्याच्या श्री. माधवराव दीक्षितांना नाशिकच्या एका महान योग्याने चिरसमाधि घेतल्याचे स्वप्न पडले. पंढरपूरास दासगणूंनाही असेच स्वप्न पडले. आणि दुसऱ्या दिवशी लक्ष्मण भट नावाच्या एका साई-भक्तास दृष्टांत झाला. सांताक्रूझला रहाणाऱ्या सौ. प्रधान यांच्या बहिणीला 'ट्रंकेतील पिवळा पितांबर समाधीवर घालण्यासाठी पाठव' असा दृष्टांत झाला,

तर काकासाहेब महाजनी नामक साईसेवकाला 'ऊठ माझा तेरावा दिवस आहे तो तू कर.' असे स्वप्न पडले.

बाबांच्या जवळ नेहमीच एक लहानसे बोचके असे. त्याला ते कुणा-लाही हात लावून देत नसत त्यांच्या महानिर्वाणानंतर ते उघडून पाहता त्यात काशीरामने प्रथम दिलेली हिरवी कफनी व हिरवी टोपी सापडली, तर माधवराव देशपांड्यांकडून बाबांची चिलीम व सटका मिळाला.

श्रीसाईबाबा आज शरीररूपाने जरी नसले, तरी त्यांनी आपल्या निर-निराळ्या भक्तांना मागच्या कित्येक जन्मांची ओळख करून दिलेली आहे. अर्थात बाबा पृथ्वीवर सारखे येत आहेत; असतातच. त्यांनी सर्व भक्तांना सांगूनच ठेवलेले आहे.

**जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धावेन भक्तांसाठी ।**
**नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य । पाहावी प्रचीत अनुभवे ॥**

बाबांचा हा अनुभव अनेक असंख्य भक्तांना जगभर येत आहे.

बाबांची फुटलेली वीट महादू फासलेने जशीच्या तशीच बाबांच्या बुट्टी-वाड्यातील समाधीत त्यांच्या उशाकडे ठेवली आहे, असे पुढे कै. माधवराव देशपांडे उर्फ 'श्यामा' व कै. तात्या पाटील कोते यांनी सांगितले. बाबांची ही वीट भक्तशिरोमणि पुंडलिकाने श्रीकृष्ण भगवानांना पंढरी क्षेत्रात बसावयास दिलेल्या विटेचे व श्रीपांडुरंग त्या विटेवर उभे आहेत तिचे दर्शक असून बाबा हे विठ्ठल-कृष्ण स्वरूप होते, असे सिद्ध होते. श्रीपांडुरंगाने वीट पायाखाली घेतली व बाबांनी तो उशाकडे घेतली, हाच काय तो फरक.

श्रीसाईबाबांचे महानिर्वाण झाल्यावर बरोबर चौदा दिवसांनी म्हणजे २८ ऑक्टोबर १९१८ रोजी बाबांचे भक्त, सेवक श्रीनानावल्ली महाराजही पैगंबरवासी झाले. ते बाबांचे मुसलमान भक्त होत.

श्रीबाबांचे आणखीन एक मुसलमान भक्त होते. त्यांचे नाव होते फकीर रोहिला. त्यांच्या तोंडामध्ये नेहमी 'अल्ला हो अकबर' हाच काय तो शब्द असे. रात्री अपरात्रीसुद्धा शिरडीतील रस्त्यावरून 'अल्ला हो अकबर' हे मोठ-मोठ्याने ओरडत फिरत व त्यामुळे शिरडीकरांची झोपमोड होत असे व त्या-बद्दल अनेक शिरडीकरांनी बाबांकडे त्यांच्याबद्दल तक्रार केली होती. पण तो आपला देवाचे नाव घेतो आहे, असे त्यांनी लोकांना सांगितले.

# महानिर्वाण

—पंडित वि. तु. बोरगांवकर,
गोवर्धन नगर को. हौसिंग सोसायटी लि.
ब्लॉक नं. १४, तिसरा मजला, नेहरू रोड.
मुलुंड, मुंबई ४०० ०८०.

जनतापाठी चिकटले मरण ।
एकाहूनी एक अभिन्न ।
मरण जीव प्रकृति लक्षण ।
जीवाचे जीवन ती विकृति ॥

मरण मारुनि जे उरती ।
पाय काळाचे शिरी ने देती ।
तया काय आयेदायांची क्षिती
अवतरती जे स्वेच्छेने ॥

भगवान गौतम बुद्धांनी जन्म, जरा, मृत्युचा शोध घेण्याचा पत्नी-पुत्र आणि राज्य वैभवाचा त्याग करून भिक्षू बनून आमरण शोध घेतला. पण त्यांनाही हा मृत्यु टाळता आला नाहीं. जगात जे जे महामानव जन्मले ते सर्व 'मृत्युपंथेचि गेले'' म्हणूनच म्हटलेले आहे जीवापाठी मरण चिकटलेले आहे. हीच त्याची स्वाभाविक परिणती आहे. जीव जर जिवंत राहिला तर ती विकृति आहे तेव्हां जी अटळ गोष्ट आहे. ती घडणारच पण ...

जगाच्या पाठीवर पाय देऊन येणारा संत महात्मा याला अपवाद असतो त्याचे नश्वर देह नाहीसा होतो. त्या क्षणापासून संताचा आत्मा सर्वगत होतो. यालाच महानिर्वाण म्हणावयाचे :

देह तरी हा नाशिवंत ।
कधी तरी होणार अन्त ।
म्हणूनि भक्ती न करावी संत ।
अनाधनंत लक्षावे ॥

— साई. स. चरित अ. ११ ओ. २१

श्री साईबाबांनीच हे स्पष्ट केलेले आहे की –

"अरे । हे मानवी शरीर हे नाशिवंत आहे, त्याचा कधी तरी अन्त होणारच आहे. तेव्हां दुःख करुन कांहीं उपयोग नाहीं. म्हणून भक्तांनी अनंताची भक्ती करावी या करिता.

तसाचि संताची अवतार स्थिती ।
प्रकट होती आणि जाती ।
परि तयांची आचरिती रीती ।
पावन करिती जगाते ।।

संत हे जगाला पावन करण्याकरिता अवतार घेतात. अवतार कार्य संपले की, क्षणाचाही विलंब न लावता पूर्वस्थितीला प्राप्त करून घेतात. तेव्हां सद्‌गुरु श्री साईनाथ यांनीही आपल्या संपूर्ण जीवनात "जे कां रंजले गांजले" त्यांची सेवा केली त्यांना अन्न, वस्त्र दिले, आपपरभाव न ठेवता रंका बरोबरच रावालाहि बसविले. धर्म, जात, पात. ज्ञानी, अज्ञानी, समाजातील सर्व थरातील लोकांना आपलेसे केले. इतकेच नव्हे "सर्व भूतमात्रावर" प्रेम करावयास शिकविले. अष्टौप्रहर सर्व लोकांना उपदेश करीत होते की –

तुम्ही कोणास बोलता उणे ।
मजला तात्काळ येते दुखणे ।

असे बाबांचे सांगणे होते

कोणासही टाकून बोलू नका सर्वांशी प्रेमाने जागा, त्या करिता अहोरात्र बाबांचे प्रयत्न, या करितांचे लोक संग्रह. पूज्य बाबांच्या सान्निध्यात श्री दादासाहेब दाभोलकर, काकासाहेब दीक्षित, दादा केळकर, आप्पासाहेब, बाळाजी पाटील, नेवास्कर, नानासाहेब निमोणकर, नानासाहेब चांदोरकर मामलेदार आदि मातब्बर मंडळी होती. .याचप्रमाणे तात्या रामचंद्र कोते पाटील, म्हाळसापती सोनार काशिराम शिंपी, भागोजी शिंदे, अब्दुल्ला, राधाकृष्णाबाई, बायजाबाई आदि बहुजन समाजातली माणसेही होती. यावरून सहज लक्षात येईल की, बाबांच्या भक्तगणात सर्व जातीय, सर्व धर्मिय लोक होते उच्च कुलीन वर्गातील स्त्रिया जशा असत तशा सामान्य अज्ञ भोळ्या भाबड्या स्त्रियापण असत.

त्यांना समान पातळीवर सर्वांना वागविले जाई. बाबांनी श्रीमंत गरीब लोकांना आपलेसे करून घेतले. त्यांची सुखदुःखे जवळून पाहिली, समजावून घेतली, दिलासा दिला, आपल्या दैवी चमत्काराने त्यांच्या दुःखाचे निरसन केले. अनेकांना दुर्धर व्याधीतून कायमचे वाचविले.

दासगणू यासारख्या भक्तांनी नोकरी सोडून हरिकीर्तनातून पूज्य सद्गुरु साईबाबांचा महिमा गाईला. दूरदूरचे लोक दर्शनाला येऊ लागले. शिरडीचा महिमा वाढला. शिरडी झाले पंढरपूर. उभ्या भारतातून पांडुरंगाच्या दर्शनार्थ भक्त मंडळी जशी येते त्याचप्रमाणे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी भक्त अव्याहतपणे येतात. कारण बाबांच्या दर्शनासाठी कोणत्याही तऱ्हेचे बंधन नाहीं. "टाक दिडकी हो म्होर" अशी दमबाजी नाहीं. इथे आहे "जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव" संकटात सापडलेल्याची सोडवणूक खुद्द बाबाच म्हणतात.

**मग जो गाई वाडेकोडे,**
**माझे चरित्र, माझे पवाडे,**
**तयाचिया मी मागे पुढे**
**चोहिकडे उभाचि ॥ अ. ३ ओ. १२.**

अशा या आपल्या भक्तांच्या कल्याणाकरिता मागे पुढे चोहिकडे उभे राहून त्यांचे रक्षण करणाऱ्या प्रेमळ साईबाबांकडे भक्त धावला नाहीं तर ते नवलच म्हणावे लागेल : आज शिरडी क्षेत्री लाखो भक्तांचा मेळा लागतो तो उगाच काय? आजही लाखो भक्तांना बाबांच्या स्वप्न दर्शनाचा लाभ मिळतो. त्यांचे दुःख दूर होते, संकटातून सोडवणूक होते. अनन्य श्रद्धा ठेवणाऱ्या भक्ताला अनुभव येतो. सबुरीने बाबांच्या भक्ती प्रेमात रंगलेल्या सद्भक्तास बाबांचा आधार मिळतो. म्हणून अण्णा दाभोलकर म्हणतात —

**देहधारी म्हणूनि जित ।**
**समाधिस्त जे ते काय मत ।**
**साई जनन मरणातीत**
**सदा अनुस्यूत स्थिर चरी ॥ अ. ३३ ओ. १३०**

संतचूडामणि भगवान श्री साईबाबा जनन मरणातीत होते असेच म्हणणे आवश्यक आहे.

तुम्ही कोणी कोठेही असा ।
भावे मजपुढे परिसता पसा ।
मी तुमचिया भावासारिका ।
रात्रंदिन उभाच ॥

म्हणून संत श्रेष्ठ श्री साईनाथ महाराज हे साक्षात् ईश्वराचे अवतार आहेत. हे प्रभो! श्री साई ईश्वरा तुझ्या दर्शनाने मी पावन झालो आहे.

# श्रीबाबांचा उपदेशपर बोध

काकासाहेब महाजनी यांच्या कन्या
**–सौ. सरोजिनी मुळये**
६ नाथ मंदिर कॉलनी,
इंदूर, म. प्रदेश.

श्री समर्थ साईबाबांनी १९१८ साली, विजया दशमीला समाधी घेतली. त्या गोष्टीला यंदा ६५ वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणून हा श्री साईलीलेचा खास अंक काढण्याचा उपक्रम अगदी स्तुत्य आहे.

माझे वडिल कै. काकासाहेब महाजनी यांना श्री बाबांनी सांगून ठेविले होते की तू माझा दहावा दिवस कर. असे आमच्या वडिलांनी आम्हांला सांगितले होते. म्हणजे श्री बाबांचा व आमचा किती निकटचा संबंध असावा हे ह्यावरून सिद्ध होत आहे.

त्यांनी आपले पुढील बेत आपल्या भक्तांना सांगून आधीच नियोजित करून ठेविले होते.

श्री. बापूसो. बुट्टी यांना जेव्हां बाबांनी वाडा बांधण्यास सांगितले होते तेव्हांच त्यांनी आपल्या समाधी-स्थानाची आखणी आपल्या मनात करून ठेविली होती. ते म्हणाले होते की शामा येथेच आपण चिरनिद्रा घेणार.

ते स्वतः वाड्याचे बांधकाम पहात होते. गाभाऱ्याचे खोदकाम पाहून शामाला म्हणाले, येथे आल्या गेल्याला सर्वांना आराम मिळेल. आपण सर्व बालगोपाल येथे बसून सदैव गोष्टी करू. येथेच सर्वांच्या सुख दुःखास वाट मोकळी करू. येथे अगदी शांत व प्रसन्न वाटते, शामाच्या खांद्यावर हात ठेवून येथेच मी विसावेन असे म्हटले. "तुम्ही माझेकडे पहा, मीही तुमचेकडे पाहिन" असे म्हणाले व त्यांच्या आशिर्वादाने तेच आज खरे झाले.

श्री बाबांचे आता असंख्य भक्त दुनियेत आहेत व सुख दुःखाला येथे वाट मोकळी आहे. ज्या कोणाला जे हवे असेल त्या भक्तांनी या समाधी मंदिरात येऊन बाबांना भक्तीभावाने विनविले की त्यांची इच्छापूर्ती होते व संकटे आली असल्यास ती आपोआप दूर होतात ह्याचा अनुभव प्रत्यक्षात येतो. हे साईलीलेत आलेल्या असंख्य अनुभवांवरून स्पष्ट समजू शकते. फक्त त्यांचा मंत्र "श्रद्धा व सबूरी" हा अवश्य लक्षात ठेविला पाहिजे.

कै. काकासो. दिक्षीतांना बाबांनी स्वतः सांगितले होते की माझे शरीर मेले तरी माझे हे स्थान मरणार नाहीं हे लक्षात ठेवा. ते सदैव जागृतच असेल. त्यासाठी माझी नेहमी आठवण ठेवा आणि अडीअडचणीला मला हाक मारा की सदैव तुमच्या पाठीशी मी उभा आहे. माझ्या अखंड तेवणाऱ्या धुनीची राख, तुम्हांला संरक्षण दिल्या वाचून रहाणार नाहीं. मी काही दिवसांकरिता जाणार आहे. ८ वर्षांनी तुमच्या कल्याणासाठी पुन्हां पृथ्वीवर अवतरेन.

श्री बाबांनी आपल्या हातांनी पेटविलेली धुनी आजतागायत ६५ वर्षे अखंड प्रज्वलित आहे हे भक्तांचे केवढे मोठे भाग्य आहे. उदीचा महिमा काय आहे हे प्रत्येकाच्या अनुभवास आले आहे, व उदी–विशेषांक सर्वांनी वाचलाच आहे. आज असंख्य भक्त या उदीवरच तरले आहेत. अशी ही उदी प्रभावशाली आहे.

तळघरातल्या पणत्यांचे महत्त्व श्री बाबांनी प्रगट केले. सत्य, धर्म शांती व प्रेम. मानवी जीवनाला अध्यात्मिक उन्नतीचा प्रकाश देणाऱ्या या चार ज्योती श्री बाबांच्या मशिदीत दीप–अमावस्येला पेटल्या होत्या.

श्री साईचे शरीर गेले, त्यांचा आत्मा विश्व–चैतन्यात विलिन झाला, पण त्यांचे दिव्यत्व मागे राहिले. तेच दिव्यत्व तीच दैवी शक्ती, आजही

भक्तांच्या हाकेला धावून जात आहे. त्यांना दिलासा देत आहे आणि साक्षात्कार घडवीत आहे. आत्मा अमर आहे हे त्यांनी सिद्ध करून दाखविले आहे. तेव्हा ते आता आपल्यात नाहीत असे कोणीही म्हणू शकणार नाही. ते अदृश्यरूपाने सर्व दूर वावरत आहेत. जरी त्यांना विलीन होऊन पासष्ट वर्षे झाली असली तरी ते अद्याप भक्तांच्या हाकेसाठी जागृत आहेत.

"श्री साई–चरणी कोटी कोटी प्रणाम"

श्री साईबाबांचा उपदेशपर बोध असा आहे.

१) ईश्वरावर श्रद्धा ठेवा.

२) परमेश्वराची निरंतर आठवण ठेवा.

३) ईश्वर कृपा होण्यास श्रद्धा व सबुरी या दोन गुणांची फार जरूरी आहे.

४) वृक्ष जसा फुले आली का नमतो तसे संपत्ती आली तरी गर्व न धरिता नम्र व्हावे.

५) सुख असो अथवा दुःख असो परमेश्वराची आठवण सतत ठेवावी.



# नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य

—श्री सुरेश सातपुते
लालबाग, मुंबई.

१) जरी हे शरीर गेलो मी टाकून;
तरी मी धावेन भक्तांसाठी ।

२) नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य;
नित्य घ्या प्रचित अनुभवे ।


० श्री साईनाथांच्या समाधीत्तोर कालातही आज असंख्य लोकांना त्यांच्या कृपा प्रसादाची प्रचिती येते. बाबांनी ह्या गोष्टीचे आश्वासन आधीच सांगितले मग करून दाखविले. म्हणून बाबांची लोकप्रियता आज प्रचंड प्रमाणात आढळून येते. वरील दोन्ही वचने सत्य असल्याचे अनुभव सहस्त्रावधि लोकाना आहेत.

ज्योतिष शास्त्र ही वेदांतार्गत विद्या असल्याने श्री साईबाबांच्या महानिर्वाण क्षणाची कुंडली पाहून, बाबांची वरील दोन्ही वचने सत्य असल्याची प्रचिती येते.

### श्री साईनाथांच्या महानिर्वाण क्षणाची कुंडली

| | | |
|---|---|---|
| इंग्रजी तारीख | : | १५ ऑक्टोबर १९१८, मंगळवार. |
| मराठी तिथी | : | अश्विन शु. ११ शके १८४०. |
| मुस्लीम तारीख | : | ९ मोहरम हिजरी सन १३३७. |
| पारसी तारीख | : | ५ अरदी बेहस्त सन १२२७. |
| महानिर्वाणाची वेळ | : | दुपारी २ वाजून ३५ मिनिटे (इष्टकाल ठीक २१ घटी) |
| नक्षत्र, चरण | : | धनिष्ठा नक्षत्र, २ रे चरण. |
| योग, करण, ऋतू, | | शूल, गर, दक्षिणायन, शरद ऋतू. |

## लग्न कुंडली




### स्पष्ट ग्रह

| लग्न | रवि | चंद्र | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | राहू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ५ | ९ | ७ | ५ | २ | ५ | ४ | ७ |
| २७ | २७ | २८ | १९ | २८ | २४ | १८ | ५ | २२ |

उपरोक्त कुंडलीमध्ये शनि या वैराग्यकारक ग्रहाचे मकर लग्न उदित असून त्या बिंदुवर अंशात्मक असा चंद्र उदय पावत आहे. चंद्र हा लोकसंग्रह व लोकप्रियता यांचा कारक असून अध्यात्मिक कुंडलीमध्ये जागतिक मनाचे प्रतिनिधित्व करतो. या चंद्राशी जागतिक बुद्धीचा कारक ग्रह बुध, नवपंचम असा महत्त्वाचा शुभयोग करीत असून त्याचवेळी तो लग्न बिंदुशीही शुभ योग करीत आहे. त्यामुळे जगातील असंख्य लोकांना बुद्धीस पटणारे असे अनुभव देऊन बाबांनी लोकसंग्रहाचे कार्य प्रचंड प्रमाणात केले आहे. याचा पुरावा ज्योतिषशास्त्रातही गवसतो.

जीवनमुक्त सत्पुरुष दोन प्रकारचे असतात. एक म्हणजे ते शुद्ध स्थिती जाऊन तेथेच विलीन होतात व दुसरा प्रकार म्हणजे शुद्ध स्थितीपर्यंत जाऊन केवळ लोक कल्याणाकरिता पुन्हां सहाव्या पायरीवर येतात. ह्या दोन्ही स्थितींचे वर्णन योगवसिष्ठात वर्णिलेले आहे.

आत्म्याचा कारक ग्रह रवि. यांचा लग्न बिंदूशी व चंद्राशी होणारा नव-पंचम हा अत्यंत शुभ योगावरून श्रीसाईबाबा हे केवळ लोक कल्याणार्थ परत आलेले आहेत असा तर्क करण्यास मुळीच हरकत नाहीं. त्याच प्रमाणे चंद्र व रविशी होणारे शुभ योग धर्म त्रिकोणातून होत असल्याने व पंचमेश शुक्र नवमात असल्याने या कार्यामागे असलेल्या अध्यात्मिक हेतूची जाणीव स्पष्टपणे होते.

या खेरीज जिज्ञासूंना या कुंडलीत अनेक योग सापडतील त्याचा अभ्यास करणे निश्चितच उद्बोधक ठरेल.

॥जय भालचंद्र ॥

**********************

# श्रीसाईबाबांचे महानिर्वाण

**********************

–सौ. उषा प्रभाकर मुळे
१६०, नारायण पेठ, पुणे ३०.

० कोणत्याही गोष्टीला योग यावा लागतो, त्याप्रमाणे मी शिरडीला शिक्षिका होते. त्यावेळी बाबांच्या निर्वाणाची खरी सत्य माहिती शिरडीचे वयोवृद्ध श्री. साई समकालीना श्री. बाप्पाजी लक्ष्मणराव रत्नपारखी यांनी मला दिली होती, परंतु ती माहिती वाचकांना देण्याचा योग या महानिर्वाण विशेषांकाकरिता आला आहे.

समाधी काल (शके १८४०) दि. १५ ऑक्टोबर मंगळवार, १९१८ शिरडी शोक सागरात विलीन झाली, काय झाले, कसे झाले. कोणालाच उमज पडेना, द्वारकामाई उदास झाली. म्लान चेहऱ्याने भक्त उभे आहेत. परंतु त्यांना धीर देणारे श्री साईराजा कोठे? दि. ३ आक्टोबर पासूनच श्री साईबाबांना सर्दी ताप यांनी अस्वस्थ केले होते. दि. १४ पासून तर त्यांना खूपच श्रास होत होता. तो दिवस कष्टाने घालविला आणि दि. १५ चा घातवार उगवला. नित्याप्रमाणे सकाळीच श्री साईबाबा शौचमुखमार्जनास जाऊन हात पाय धुवून द्वारकामाईतील खांबास टेकून बसले समोर धुनि प्रज्वलीत झाली होती. थोड्या वेळाने देव्हाऱ्याच्या जागी ते जाऊन बसले. नित्याप्रमाणे ब्रम्हज्ञानाच्या गोष्टी त्यांनी सांगितल्या, आरतीची तयारी लवकर करण्यास सांगितली. श्री जोग व सौ. जोग यांनी नैवेद्य अर्पून आरती केली. सर्व भक्तांस स्वतः उभे राहून उदी प्रसाद दिला सर्वांनी भोजनास दिक्षित वाड्यात जावे अशी आज्ञा केली.

त्या वेळेस दुपारचा १॥ वाजला होता, श्री साईबाबांनी महादू फसले यास विडा कुटून देण्यास सांगितले. त्यांनी विडा कुटुन श्री साईंच्या हातावर दिला व चांदीच्या झारीतून पाणी दिले. श्री. बाबांनी पाण्याचा एक-एक घोट घेण्याचा प्रयत्न केला परंतु अर्धा पाण्याचा घोट तोंडातून बाहेर आला त्यावेळी त्यांचे नयन अर्धोन्मिलित झाले व त्यांनी आपले अंग बयाजी पाटलाच्या (ते पाठीमागे बसले होते) अंगावर टेकून लक्ष्मीबाई शिंदे यांना नऊ रुपये त्यांनी दिले. (म्हणजे नवविधाभक्ती मला प्रिय आहे हे सुचविले) श्री साईबाबांनी पारमार्थिक पद्धतिने जगास अंतकाली दानधर्म व्हावयास पाहिजे असे दर्शित केले.

दि. १५ मंगळवार दुपारी २॥ वाजता बाबांची प्रकृति अतिशयच बिघडली. त्यांच्या प्रकृतीची ती गंभीर अवस्था बघून तेथे हजर असणारे पाच भक्तांपैकी (१) बयाजी कोते (२) भागूजी शिंदे (३) लक्ष्मीबाई शिंदे (४) महादू फसले (५) बाप्पाजी रत्नपारखी यांनी तावडतोब दीक्षित वाड्यात जाऊन बाबांच्या प्रकृतीची बातमी सांगितली. त्याबरोबर डॉ. पिल्ले नागपूरकर यांना घेऊन आले त्यांनी श्री साईंच्या हातास स्पर्श करुन नाडी पाहिली त्यांना समजून चुकले की शिरडीचा आत्मा ब्रम्हांडात विलीन झाला. शिरडीवर दुःखाची अवकळा पसरली.

त्यानंतर हिंदू–मुसलमान वाद सुरु झाला. पुढे बाबा दासगणूंच्या स्वप्नात दिसले. लवकर ये भित कोसळली न्याय निवाडा कर, पूर्वीपासून श्री. साईबाबा बुटींच्या वाड्यात बसून खेळू म्हणत होते. त्याप्रमाणे काही साईभक्त अप्पा कोते, माधवराव देशपांडे, काकासाहेब दीक्षित रहात्याचे खुशालचंद शेठ, दौलत-राम शेठ, मोरेश्वर प्रधान यांच्या सर्वांच्या समोर बुटींने (बापूसाहेब) सर्व हिंदूस हात जोडून विनंती केली की, श्री साईबाबांना या नव्या वाड्यात आणावे (समाधिकरिता) या वाड्यावर मी कसलाही हक्क दाखविणार नाहीं. हे माझे वचन मी तुळशीपत्र घेऊन पुरे करीन.

या सर्व गोष्टी श्री. तात्या पाटील कोते यांना कळविल्या. कारण ते आजारी होते. त्यांनी श्री. रामचंद्र पाटील, पोलिस पाटील यांना कळविले की, श्री साईबाबांना वाड्यात घेऊन जाण्याचे प्रयत्न करा. हिंदुच्या बहुसंख्येने श्री. साईबाबांना बुटी वाड्यात नेण्याचे निश्चित झाले. मुस्लीम बंधुनेही श्री. साईबाबांच्या पालखीस खांदा देण्याचे ठरविले आणि आजही शिरडी क्षेत्रामध्ये अफाट समाज समानतेने एकरूप झालेला दिसत आहे. भेदा–भेद स्पृश्य–अस्पृश्य गरीब–श्रीमंत ही भावनाच नाहीं. केवढी ही शक्ती की त्या शक्तीने अथांग समाज एकरुप होऊन श्री साईपुढे नतमस्तक होत आहे.

समाधी सोहळा झाल्यानंतर हिंदू पद्धतीप्रमाण श्री बाबांचा १३ वा दिवस श्राद्ध मुंबईच्या भक्तांनी केले. त्यात श्री. काकासाहेब दीक्षित, काका महाजनी, मोरेश्वर प्रधान, तर्खड, सुंदरराव नवलकर पुण्याचे गोविंदराव बॅरिस्टर, रासने काका, खाजगीवाले अशा सर्व भक्तांनी बुंदीच्या लाडूचा प्रसाद सर्व भक्तांना दिला तो दिवस यात्रेचा दिसत होता. अफाट गर्दी लोटली होती त्या प्रसादा-करिता.

तेरा ब्राम्हण आराधना विधिस बसविले होते. प्रत्येकास धोतर, शाल व २१ रुपये दक्षिणा दिली. हा विधि श्री. काकासाहेब दीक्षित यांनी केला. त्या वेळेस श्री. बाळासाहेब देवही तेथे होते.

त्या नंतर मुस्लीम पद्धतीने २० व्या दिवशी संध्याकाळी संदल मोठ्या प्रमाणात काढून कुराण शरीफ व नमाज पढणे हा ही कार्यक्रम झाला हा ही एक ऐक्याचा भाव होता. पुढे ४० व्या दिवशी दासगणु महाराजांनी तीन दिवस उत्सव केला, एक हजार भक्तास सुग्रास भोजन दिले. पंढरपूराहून पंडितशास्त्री बोलावून विधि केला. ब्राम्हणास चांदीचे पेले, वस्त्र अर्पण केले (तो चांदीचा पेला श्री. रत्नपारखी यांच्या जवळ अद्याप आहे), श्री. उपासनी महाराजांनी श्री काशीक्षेत्री जाऊन ६० व्या दिवशी वेदोक्त हवन विधि दानधर्म केला महानिर्वाण संपले, परंतु ते तेजोवलय अदृश्य रूपाने अमर आहे.

॥ स्वयं प्रकाश श्री साईनाथ ॥
॥ अवतरले भक्त कल्याणार्थ ॥

---

# स्वर्गारोहण

—श्री. पां. वा. भुतकर.
२३–१६७५ अभ्युदयनगर,
काळाचौकी, मुंबई ४०० ०३३

० आजचा दिवस हा वर्षातील फार महत्वाचा दिवस. या दिवशी पांडवांना विजय मिळाला. या दिवसाने लोकांना सुवर्णाचे दान केले. या मुहूर्तावर मोठमोठ्या लढाया जिंकण्यात आल्या. या मुहूर्तावर धर्माने अधर्मावर विजय मिळविला. असा हा आजचा महन्मंगल दिवस म्हणजे दसरा. पण आज काय झाले आहे? या शुभ दिवसावर अमंगलाची छाया का पडली आहे? पशुपक्षी केविलवाणे स्वर का काढताहेत? काही कळत नाहीं. कुठेही उत्साहाचे वातावरण नाहीं. कोठल्यातरी अनामिक भीतीने लोकांचे चेहरे काळवंडलेले दिसतात. कसलीतरी भीषण आपत्ती या शिर्डी नगरीवर कोसळणार. पण कसली आपत्ती?

मशिदीच्या परिसरात बरीच भक्त मंडळी जमा झालेली होती. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भीती व चिंता यांचे साम्राज्य पसरले होते. गर्दी इतकी प्रचंड होती पण गजबजाट मात्र अजिबात नव्हता. एवढा मोठा जनसमुदाय पण त्या आवारात मात्र स्मशान शांतता नांदत होती. मधूनच कोणीतरी भक्त दुसऱ्याच्या कानात कुजबूजत होता इतकेच! बाकी सर्व शांत. मधून मधून कोणीतरी भक्त मशिदीतून बाहेर येत होता व काही न बोलताच समुदायात मिसळत होता.

इतक्यात मशिदीतून माधवराव देशपांडे उर्फ शामा बाहेर आले. त्यांना पहाताच सर्वजणांच्या नजरा त्यांच्यावर स्थिर झाल्या. त्यांनी सर्व भक्तांना एकत्र करून बाबांची आज्ञा सांगितली. बाबांनी त्यांना अशी आज्ञा केली होती की सर्व भक्तांनी आता घरी जावे व जेवण करून नंतर परत यावे.

बाबांचे दुखणे विकोपाला गेले होते पण सर्व भक्तांना माहित होते की बाबा हे मृत्युंजय आहेत. त्यामुळे मनातून चिंता होती तरीही पूर्वीची कथा लक्षात घेऊन ते थोडेसे तरी आशावादी होते. त्यांना माहित होते की पूर्वी बाबांनी तीन दिवस ब्रम्हांडी प्राण ठेवले होते. त्यानंतर ते परत भूतलावर आल्यानंतर त्यांची प्रकृती ठणठणीत बरी झाली.

बाबांच्या आज्ञेप्रमाणे सर्व भक्त आपापल्या घरी जेवावयास गेले. बाबांची आज्ञा मोडण्याची कोणाची प्राज्ञा होती? पण बाबांची स्थिति पाहिल्यानंतर कोणत्याही भक्तास तिथून जाण्याची इच्छाच होईना. पण त्यांचा नाईलाज झाला कारण बाबांची आज्ञा!

त्रिकालज्ञानी बाबांना भविष्याचे संपूर्ण ज्ञान होते. त्यांनी वझे बुवांना रामविजय वाचण्याची आज्ञा केली वझेबुवांनी आठ दिवस पारायण केले नंतर बाबांनी वझ्यांना अखंड पोथी वाचावयास लावली. अशा तऱ्हेने अकरा दिवस सतत पोथी वाचल्यामुळे वझे कंटाळले. मग बाबांनीच त्यांना तेथून जाण्याची आज्ञा केली.

आता पोथी वाचण्याचे काय कारण असा प्रश्न वाचकांच्या मनात उभा राहिल पण परमेश्वराचे नामस्मरण चालू असतानाच आपण देहविसर्जन करावा अशीच संतांची परंपरा आहे हे लक्षात घेऊनच बाबांनी ती व्यवस्था केली होती. वास्तविक पहाता बाबा हे जन्ममरणाच्या पलिकडे होते पण लौकिक रीत लक्षात

घेऊनच बाबा सर्व रूढी पाळत होते. पूर्णब्रम्ह साई हे इच्छामरणी होते. त्यांना कसले कृतांताचे भय! त्यांच्यात वाटेल त्या दिवशी वाटेल त्या क्षणी देहत्याग करण्याचे सामर्थ्य होते.

बाबांनी आपले जीवीतकार्य पुरे करण्यासाठी साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त सिमोल्लंघनाच्या दिवस दसरा हाच निवडला होता. पवित्र व शुभ असा दसरा हाच देहाचे सिमोल्लंघनास त्यांना योग्य वाटला असावा. जरी साई भगवान हे लौकिक दृष्ट्या शरीरधारी होते तरी सदैव शरीरा बाहेरच असत. शरीराबाहेर राहून जगताच्या कल्याणाकरिता झटले होते. कधी नानासाहेब चांदोरकरांच्या घरी उडी घेऊन दे. त्यांच्या अडलेल्या मुलीची सुटका कर तर कधी डहाणूला मामलेदार देव यांच्या मातोश्रींच्या व्रताच्या सांगता समारंभास उपस्थित रहात. कधी लोहाराचे पोर अग्नीतून बाहेर काढ. अशा अनेक गोष्टी ते देहाबाहेरून करीत. पण याही वेळेस ते देहरूपाने शिरडीतच असत. परमेश्वरा प्रमाणे सर्व गामित्व हे त्यांचे वैशिष्ठ असल्यास नवल नाहीं. वर सांगितल्या प्रमाणे त्यांनी देहत्यागाच्या वेळी सर्व भक्तांना घरी जेवावयास पाठविले. इतके दिवस प्रेमाने गोळा केलेल्या भक्तांच्या डोळ्यातील अश्रू त्यांना पहावणार नव्हते. जीवापाड जतन केलेल्या कोणत्याही गोष्टीचा अंत कोणीही सहजगत्या पाहू शकणार नाहीं. जीवापाड प्रेम व भक्ती ज्यांच्यावर केली ते भक्त आपल्या देवाचा देहत्याग उघड्या डोळ्यांनी पाहू शकले नसते.

सर्व भक्तमंडळी जेवावयास गेली आहेत याची खात्री झाल्यावर बाबांनी मेघाला दिलेली श्री शंकराची पिंडी आणवली. लक्ष्मी–बायजाबाईची सून त्यावेळी बाबांच्या जवळच होती. बाबांनीच तिला पसंत करून बायजाबाईच्या घरी आणली होती. तिचीही बाबांवर अपरंपार भक्ती होती. बाबांना प्रेमाने जेवण करून घालणे, जरूर ती सर्व सेवा करणे या सर्व गोष्टींचा विचार करून बाबांनी अंतसमयी तिला तेथे ठेऊन घेतले. देहत्यागाची सर्व तयारी झाल्यावर बाबांनी लक्ष्मीकडे पाहिले. तिच्या डोळ्यात अश्रू दाटून आले होते. बाबांनी कफनीच्या खिशात हात घातला व पाच रुपये काढून लक्ष्मीच्या हातावर ठेवले. दुसऱ्या खिशात हात घालून चार रुपये काढले व तेही तिच्या हातावर ठेवले. नंतर बाबा हळू आवाजात म्हणाले, "लक्ष्मी पोरी येतो मी" हेच बाबांचे अखेरचे शब्द व हीच बाबांची अखेरची दक्षिणा.

वास्तविक पहाता ज्या हातांनी बाबांनी लाखो रुपये वाटले त्यांनी लक्ष्मीला नऊ रुपये दिले ही महत्त्वाची गोष्ट नव्हती. ते लौकिक अर्थाने नऊ रुपये असले तरी नवविधा भक्तीचे प्रतीक म्हणून लक्ष्मीच्या हाती सोपविले होते.

"लक्ष्मी, पोरी येतो मी" असे म्हणून बाबा तक्क्याला टेकून बसले. सेवा-कडून आणलेल्या शिवलिंगास नमस्कार केला, 'ॐ नमो शिवाय' असे शब्द त्यांच्या तोंडातून निघाले. तोच दोन्ही डोळ्यातून दोन तेजस्वी ज्योती निघाल्या व समोरील शिवलिंगात एकरूप होऊन गेल्या. ही प्रत्यक्ष वस्तुस्थिती लक्ष्मीने स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली. ती धन्य झाली. आत्म्याचे परमात्म्याशी झालेले मीलन, जीवाचे शिवाशी झालेले मीलन फक्त एकट्या लक्ष्मीने पाहिले. हजारो भक्त मंडळी शिरडीत हजर असतानासुद्धा हे सुवर्ण मीलन पहाण्याचे भाग्य मात्र एकट्या लक्ष्मीशिवाय अन्य कोणालाही लाभले नाही.

इकडे ही परिस्थिती घडत असतांना दूर अंतरावर पंढरपूरक्षेत्री दासगणू महाराजांना साईबाबांनी प्रत्यक्ष दृष्टांत देऊन सांगितले, "अरे दासगणू, शिर्डीत रहाणे येथील तेल्या–वाण्यांनी मला नकोसे केले आहे रे! माझी मशीद या गुंडांनी पार उध्वस्त करून टाकली आहे. मशीदीचे नाव निशाण उरलेले नाही, ती पुरेपुर जमीनदोस्त करून टाकली आहे. मी कंटाळून इथं पंढरपूरला आलो आहे. मला वेगवेगळी अशी भुष्कळ फुले हवी आहेत. ही माझी इच्छा तू पूरी कर"

त्याच अर्थाचे पत्रदेखील दासगणूमहाराजांना पंढरपूरला मिळाले. बाबांच्या निर्वाणाचे वृत्त समजताच दासगणूंना धक्का बसला. दुःखाने दहा मिनिटे त्यांच्या तोंडातून एकही शब्द बाहेर आला नाही. पण दुःख करीत बसण्याची ही वेळ नव्हे हे जाणून दासगणू आपल्या शिष्यांसह तावडतोब निघाले. शिरडीत आल्या-नंतर त्यांनी हरीनामाचा गजर केला. बाबांच्या सर्व शरीरावर असंख्य फुले वाहून त्यांनी आपली श्रद्धांजली वाहिली.

इकडे शिरडीत बाबांच्या निधनाची वार्ता वायुवेगाने गावात व आजूबाजूच्या गावात पसरली. जेवावयास बसलेले भक्त हातातले घास टाकून मशीदीकडे धावले. मशीदीत प्रचंड गर्दी झाली. काही भक्त दुःखातिशयाने मुर्च्छीत पडले. काही उर बडवून रडत होते. "बाबा बाबा" म्हणून बरेचजण टाहो फोडत

होते. दसऱ्यासारखा सुवर्णाचा दिवस पण जिथे तिथे आक्रोश व दुःख वेदनांनी सारा आसमंत भरून गेला होता. सर्व शिरडी नगरीवर जणू काही आकाशाची कुऱ्हाड पडली होती.

शिरडी गावाची परिस्थिती फार दयनीय झाली होती. साईबाबांवाचून शिरडी गाव म्हणजे प्राणावाचून शरीर! कमळाशिवाय सरोवर! वासराशिवाय गाय! देवाशिवाय देऊळ! जी मशीद साईबाबा आसनावर असताना मोठ्या दिमाखाने मिरवित होती ती आता अगदी हीन दीन झाली होती. सतीची पुण्याई संपली होती.

दुःखावेग हळू हळू ओसरू लागला. आता पुढील तयारी करणे आवश्यक होते. गावातील हिंदू मुसलमान वगैरे प्रत्येक जातीजमातीचे लोक तिथे होते. आता हा बाबांचा पार्थीव देह कोठे ठेवावा याबद्दल विचार सुरू झाला. पूरे छत्तीस तास विचार विनिमय चालू होता. तरी एकमत होईना. मुसलमान बंधूचे म्हणणे की साईबाबा हे बोलून चालून फकीर त्यांचा देह कबरस्थानात न्यावा. दुसरे काही म्हणाले हा देह उघड्यावर ठेवून त्यावर थडगे बांधूया. कुणाचा काय कुणाचा काय असा विचार चालू होता. इतक्यात बाबांच्या हाताची हालचाल झाल्यासारखे वाटले. लोकांना परमानंद झाला. आपले बाबा जिवंत झाले असे त्यांना वाटले. पण फुकट! बाबांनी आपला हात बुटीसाहेबांनी बांधलेल्या नवीन वाड्याकडे केला व परत सारे पूर्वीसारखेच थंड! तेव्हां रामचंद्र पाटील उठले व सर्व समुदायाला उद्देशून म्हणाले, "आता तरी खात्री पटली ना! बाबांचे हे शरीर वाड्यातच ठेवले जाईल. तेच समाधि मंदिर होईल". सर्वांना पाटलांचे म्हणणे पटले व बाबांच्या पार्थीव शरीराला वाड्यात विश्रांति देण्याचे एकमताने ठरले.

त्याच दिवशी पहाटे लक्ष्मणमामांना स्वप्न पडले. स्वप्नात साईबाबांनी त्यांना गदगदा हलवले व म्हणाले, "लक्ष्मणा उठ. झोपलास काय?" पूजेची तयारी कर. आज बापूसाहेब जोग पूजेला येणार नाहीत. त्यांना असे वाटते की मी मृत झालो, पण तुला खात्री आहे ना मी नित्य जिवंत आहे. चल उठ, पूजेची तयारी कर. काकड आरतीची वेळ झाली आहे."

बाबांना पाहिल्याबरोबर लक्ष्मणमामा ताडकन् उठले. प्रातःकर्म उरकून पूजा साहित्य बरोबर घेतले. मशीदीत पाऊल पडले व चिरकाल निद्रा घेत

असलेल्या बाबांच्या मुखाकडे पाहिले. तशाही स्थितीत बाबांचा चेहरा हसरा होता. आधीच लक्ष्मणमामांचे साईबाबांवर जीवापाड प्रेम व तशात त्यांना दृष्टांत झालेला. त्यांनी बाबांच्या तोंडाच्या बाजूस आलेले वस्त्र थोडे बाजला केले. प्रेमभावनेने पायाला हात लावून नमस्कार केला. ही अखेरचीच पूजा आहे हे लक्षात आल्याबरोबर त्यांना भडभडून आले. हात थरथर कापू लागले. त्यावेळी जे लोक ही पूजा पहात होते त्यांच्याही डोळ्यातून अश्रूंच्या धारा वहात होत्या. मोठ्या जड अंतःकरणाने त्यांनी बाबांच्या हातापायाला पाणी लावले व नंतर गंध लावले. कपाळाला गंध लावत असतांना तेथे उपस्थित असलेल्या मुसलमान बांधवांनी हरकत घेतली. पण त्यांना न जुमानता त्यांनी बाबांच्या कपाळावर गंधाचा मोठा टिळा लावला. उजव्या हाताची मूठ उघडली व त्यात दक्षिणा ठेऊन ती पूर्ववत बंद केली. नंतर पायावर डोके ठेवले पण तेथून ते उठेनात! त्यांनी बाबांचे पाय घट्ट धरून ठेवले होते. काहीं भक्त पुढे झाले व त्यांनी लक्ष्मणमामांना कसेबसे दूर नेऊन बसविले.

त्या दिवशी संध्याकाळी बाबांची अंत्ययात्रा काढण्याचे नक्की झाले. दुपारची आरती नित्याप्रमाणे चावडीत न करता मशीदीतच सुरू झाली. मोठ्या दुःखद वातावरणात दुपारची आरती संपली.

संध्याकाळी चार वाजता बाबांची अंत्ययात्रा मशीदीतूनच काढण्यात आली. गावोगावचे हजारो स्त्री पुरुष अंत्ययात्रेत सामील झाले होते. शिरडी गावाने अशी प्रचंड अंत्ययात्रा कधी पाहिली नव्हती. हारांचे प्रचंड ढीग बाबांच्या पार्थीव देहावर वहाण्यात आले. सर्व गावभर फिरून झाल्यानंतर शेवटी अंत्ययात्रा बुट्टींच्या वाड्यात आली. मुरलीधराकरिता जिथे चौथरा बांधला होता तिथे बाबांचे पार्थिव शरीर ठेवण्यात आले. अत्तर, गुलाब व विविधरंगी फुले यांनी ती जागा सुगंधित व सुशोभित करून मोठ्या सन्मानपूर्वक बाबांचा देह तिथे ठेवण्यात आला. बाबांनी आपला देह ठेऊन बायजाबाईच्या तात्याचे प्राण वाचविले असे लोक म्हणत होते. बाबांच्या देहावसानानंतर तात्याची प्रकृती हळू हळू सुधारत होती.

बाबांचा देह हळूहळू चौथऱ्याकडे आणण्यात आला. त्यावेळी हे साईभगवानाचे अखेरचेच दर्शन आहे हे लक्षात येऊन हजारो लोकांच्या डोळ्यातून अश्रूंचे पूर वाहू लागले. शेवटी भक्तांनी आपल्या भावनांवर काबू मिळविला

व बाबांचा देह सन्मानपूर्वक चौथऱ्यावर ठेवला. आजूबाजूच्या अत्तर, फुले व उदबत्त्या यांच्या सुगंधी वातावरणात बाजूची समाधी बांधण्यात आली व बाबांचा देह मोठ्या भक्तीभावाने समाधित बंदिस्त करण्यात आला. त्यावेळी शामा उभा राहिला व म्हणाला, "बाबांनी जन्मभर दीन–दुबळ्यांचे अश्रू पुसले. सर्वभूती परमेश्वर पाहिला. आज हा भगवानाचा प्रेषित आपले जीवित कार्य संपवून स्वर्गलोकी प्रयाण करीत आहे. अशा या शुभदिनी आपण आपल्या भावनांवर काबू मिळविला पाहिजे. आता ते दृष्टीआड झाले असले तरी आपण स्वतःस सावरले पाहिजे. डोळ्यातून अश्रू येता कामा नये नाहीतर बाबांच्या आत्म्यास क्लेश होतील."

शामाने जरी धैर्य धरून भाषण केले तरीही शेवटी शेवटी त्याला गहिवरून आले. भाषण संपल्यानंतर त्याने बापूसाहेब जोगांना मिठी मारली. बाबा व शामा यांचे नाते अतूट होते. अष्टौप्रहर शामा बाबांच्या जवळ असे. भक्त मंडळीही आपापली कामे बाबांकडून करून घ्यावयाची झाल्यास शामासच पुढे करीत. अशा या शामास बाबांचा हा विरह अगदी जिव्हारी घाव बसल्यासारखा वाटल्यास नवल नाही. सर्व भक्तात शामा हा अगदी जवळचा भक्त असल्यामुळे समाधीचे पूजन त्याने प्रथम केले. यथाविधि पूजा करून त्याने समाधीस साष्टांग दंडवत घातला. सर्वजण धडधडत्या अंतःकरणाने ते दृश्य पहात होते. इतक्यात वाड्यातील जनसमुदाय आश्चर्याने चोहोबाजूस पाहु लागला कारण वाड्यातून बाबांचा आवाज येत होता.

"भक्तांनो मी नित्य जिवंत आहे. तुम्ही या वाड्यात हजारोंनी उपस्थित आहात पण यानंतर या समाधीचे लोक लाखोंनी दर्शन घेतील. माझी ही समाधी नवसास पावेल. या समाधीतून माझी हाडे भक्तांशी बोलतील. त्यांच्या अडचणी दूर करतील."

आश्चर्याने थक्क झालेल्या प्रचंड जनसमुदायाने समाधीला अभिवादन केले व एकमुखाने गर्जना केली, "साईनाथ महाराज की जय! साईबाबा अमर रहे!"

# जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति

—सौ. शोभना सोनवलकर
कस्तुरबा ग्राम, मु. पो. इंदूर

आपल्या भारताचे हे वैशिष्ट्य आहे की, ह्या भूमीत जेवढे साधु, संत, संन्यासी जन्माला आले आहेत तेवढे कुठल्याच देशात झालेले नाहीत.

युगा युगापासून आजतागायत 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' असे जन्म घेतलेले संत, महामुनी, संन्यासी आपल्या भारतभूमीला लाभलेले आहेत. बंगालच्या सुपीक भूमीत जन्मलेले स्वामी विवेकानंद तर पहिले भारतीय होते ज्यांनी आपले विचार, आपले ज्ञान, आपल्या वेदवेदांताचे महत्त्व, पाश्चिमात्य, देशात जाऊन त्यांच्यासमोर मांडले व त्यांना आपले शिष्य बनवून आपल्या देशात आणले.

श्री रामकृष्ण परमहंसांचा त्यांच्यावर वरदहस्त होता. विद्यार्थीदशेतच त्यांचे शिष्य बनले. त्या नरेंद्रांनी त्यांना एकदा विचारले की, 'आपल्याला ईश्वर दर्शन झालेले आहे का?' तेव्हां परमहंसांनी म्हटल 'हां, ईश्वर ठीक असेच आहेत की जसा तू माझ्या समोर!' म्हणजेच मानवी प्राणी एवढंच नाव पशुपक्षांच्या रूपातून परमेश्वर ह्या जगात वास्तव्य करीत आहे.

विवेकानंदांना ध्यान लावून साक्षात् जगदंबेचे दर्शन करण्याची उत्कट इच्छा असूनही परमहंसांनी त्यांना तसं करू दिलं नाही.

"ध्यानाने स्वतःची मुक्ती करून घेण्यात नरजन्माचं सार्थक नाही. नरेंद्र तुला स्वतःची मुक्ती करण्यापेक्षाही मोठे कार्य करायचे आहे! एखाद्या वटवृक्षा-सारखा तू विशाल बन की, तुझ्या छायेत सर्व प्राणीमात्रांना सुख मिळेल! दीन दुबळ्यांचा उद्धार, त्यांना पोटभर अन्न मिळवून देण्याची व्यवस्था, जाती भेद, धर्मभेद, विसरून सर्वांना सारखा आश्रय देणे सर्वभूती परमेश्वर पाहून सर्वांची सेवा करणे यातच तुला आपल्या जीवनाचे कर्तव्य समजायचं आहे.'

आपल्या गुरुंच्या आज्ञेप्रमाणे विवेकानंदांनी आपल्या कार्याला सुरवात करून देशात विदेशात फिरून आपल्या विचारांचा प्रसार केला. देशवासियांचे

कल्याण हेच परमेश्वर पूजेपेक्षा श्रेष्ठ प्रतिपादले. जिथून मिळेल तिथून (राजे, राजवाडे व काही विदेशियांनी पण) धन घेऊन त्यांनी 'रामकृष्ण मिशन' आश्रम व औषधालय निर्माण केले. दुर्दैव आपलं की अशा थोर, संयमी विभूतीच अवतार कार्य अल्प वयातच संपलं!'

श्री साईबाबा जवळ जवळ त्यांचेच समकालीन पण त्यांच्यानंतर आणखी सोळा वर्षे जगले व त्यांनीही जनतेला अशाच प्रकारचा उपदेश दिला.

स्वतःच्या शक्तिनी दीपक प्रज्वलीत करणाऱ्या बाबांना काय अशक्य होतं? त्यांनाही ध्यानानी स्वतःची मुक्ति करून घेता आली असती पण बाबांनी दीन दुबळ्यांचा उद्धार, त्यांना प्रेम देऊन आपलसं करणं, आपलं पहिलं कर्तव्य समजलं! कुठेतरी डुक्कर भुकेलं आहे, कुठल्यातरी कुत्र्याला भूक लागली आहे हे त्यांना समजलं की त्यांना अन्न देण्याची व्यवस्था बाबा भक्तांकडून करवायचे. कुठल्या रोहिल्याला त्याची बाईल छळते तर आपल्या मशिदीत आश्रय द्यायचा! स्वतः धान्य मागून आणून आपल्या हातांनी शिजवून गोर-गरीबांना वाटायचं. रोज कुणाकुणाला पैसे द्यायचे हेच बाबांच कार्य!'

'व्हावया वर्णाश्रम धर्मसंरक्षण । करावया अधर्माचे निर्दळण ।
दीन गरीब दुबळ्यांचे संरक्षण । क्षिती अवतरण संतांचे ।
संत स्वये ठायींचे मुक्त । दीनोद्धरणी सदैव उद्युक्त ।
अवतार तयांचा केवळ परार्थ । निजस्वार्थ त्या नाहीं ॥

(सा. च. अ. ४ ओ. १३, १४)

# साई साक्षात्कारी दिव्यावतार

—श्री. रमाकांत पंडित.
'प्रभास्मृती', भाऊदाजी मार्ग,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९.

० जगातील दुःखभार हलका व्हावा व शाश्वतसुख कशात आहे याची लोकांना जाणीव व्हावी यासाठी देव संताच्या रूपाने जगात वावरत असतात इतर थोर संताप्रमाणे साईबाबा शिरडीत अवतीर्ण झाले व त्यांनी जनतेला शाश्वत सुखाचा मार्ग समजावा यासाठी परोपरीने प्रयत्न केले. ज्याचा जसा कल असेल, ज्याचे जे आराध्य दैवत असेल ज्याला ज्या नामाची गोडी लागली असेल ते त्याने घ्यावे अहंकाराचा त्याग करावा गोर गरीबांच्या सेवेत आनंद मानावा, मानव सेवा हीच देव सेवा समजून जे दुःखी कष्टी असतील त्यांची सेवा करावी व अशा मार्गानी स्वतः सुखी होऊन इतरांनाही सुखी करण्यासाठी झटावे याची शिकवण परोपरीने दिली.

श्री साईबाबांनी अभंग, ओव्या व उपदेशपर वाङ्मय निर्माण केले नाहीं. मात्र त्यांनी भिन्न धर्मियातील परस्परां विषयीच्या द्वेष भावना नष्ट करण्या-साठी अभिनव मार्ग शोधून काढला व सुशिक्षितांना हाताशी धरून तो रूढ करून दाखविला यातच त्यांचे देवपण आहे, सर्व धर्मियांना एकेश्वरवाद निर्मि-ण्याचा त्यांनी आपल्या अवतार कार्यात कसोशीने प्रयत्न केला त्यांचे भक्त जसे हिंदु, मुसलमान तसे पारशी, ख्रिश्चन, जैन, शीखही आहेत ह्या सर्व धर्मियांना एकत्र आणण्यासाठी त्यांनी प्रथम फळे वाटण्याचा क्रम सुरू केला, त्यानंतर हळू हळू स्वयंपाक करून ते त्यांना एकत्र बसवून भोजन देऊ लागले. लोक आनंदाने बाबांचा प्रसाद मानून ग्रहण करू लागले. बाबा म्हणत आपण एकाच परमेश्वराची लेकरे आहोत भेदाभेद भाव मानव निर्मित आहे, म्हणून आपण तो मोडून टाकला पाहिजे. जसे ते भजन कीर्तनात मग्न होत, तसे ते फकीरांना बोलावून त्यांच्याकडून मशीदीत नमाज पढवून घेत.

श्रीसाईबाबा विसाव्या शतकातले आत्म साक्षात्कार झालेले आत्मनिष्ठ असे गूढवादी होते. अहिंसाधर्माचे पालन करावे, जरूरीपेक्षा अधिक द्रव्याचा

हव्यास न धरता स्वतःच्या गरजा भागवून जे उरेल त्याचा विनियोग परोपकारार्थ करावा अशी किती तरी बहुमोल तत्त्वे त्यांनी सांगितली तीसुद्धा स्वतःच्या आचरणातून प्रयत्न करीत राहावे प्रयत्न म्हणजेच परमेश्वर हे सुद्धा बाबांनी आपल्या भक्तांना सांगितले काम सतत काम अविश्रांत श्रम करा असे वागणाऱ्याच्या धर्मविद्रूप परमेश्वर साठवलेला आहे. ते म्हणत तुम्ही सर्व माझ्याकडे श्रद्धा भक्तीने पहा मी तुमच्याकडे कृपादृष्टीने पाहिन, श्रीसाईबाबांनी हयातभर ममता, विश्वबंधुत्व, भूतदया व परमेश्वराबद्दल श्रद्धा, भक्ती आदि संस्कृतीला पोषक असलेल्या मानवतावादी गोष्टीचा हिरीरीने प्रसार केला.

श्रीसाईबाबा प्रत्येक भक्ताकडे प्रथम दोन पैसे अर्पण करा असे सांगत ते म्हणत श्रद्धा सबुरी हे दोन मला द्याल तर तुम्ही प्रपंच करून परमार्थ साधाल, प्रत्येक क्षणाला माणसाने श्रद्धेने त्यांच्या कार्यात राहून परमेश्वरावर विश्वास ठेवून सबुरीने राहिले तर हा भवसागर पार कराल असे ते कळकळीचे उद्गार भक्तांच्या सुखासाठी काढीत. त्यांनी आपला दरबार सर्व मानव जातीसाठी खुला करून ठेवला. श्रीसाई हिंदु मुसलमानांचे सण समानतेने करून घेई, राम नवमी, गोकुळ अष्टमी, गुरुपौर्णिमा बाबांच्या दरबारात साजरी होई. मोहरम सणात ताबूत बनवून मिरवणूक काढण्यात येई. राम आणि रहीम एक आहे म्हणून भक्तीही एक आहे असे सांगून ते सर्वांनाही समानतेने जवळ घेत.

त्यांच्या निर्वाणाला आता ६४ वर्षे होऊन गेली तरीसुद्धा द्वारकामाईत त्यांनी आपल्या योग सामर्थ्याद्वारे पेटविलेल्या धूनीतून उदी असंख्य भक्तांना संभरटक्के उपयोगी पडत आहे. हयाती नंतर देखील अदृश्य रूपाने बाबा ह्या उदीला आशिर्वाद देत आहेत.

तुमच्यावर मी जी कृपा केली आहे त्यापेक्षा अनंत पटीने जास्त कृपा मी देहपतना नंतर तुमचेवर करीन असे खुद्द बाबांचे सांगणे आहे. श्रीसाईबाबांनी आम्हांला जगाकडे पहाण्याची व जगाशी वागण्याची उदार दृष्टी दिली. त्यांचे अंतःकरण सर्वबाबतीत विशाल व सर्वांसाठी भरलेले होते, राम कृष्ण विठ्ठल या सर्वांत मी आहे. आपल्या कुलदैवतेची पुजा करावी म्हणजे मी त्यात आहे असे ते सांगत.

आधुनिक काळात ज्यांना संतचुडामणि हे नामाभिधान देता येईल असे शिरडीचे श्रीसाईबाबा हेच होत, अशा ह्या संताची शिकवण अद्यापही प्रेरक अशीच आहे. श्रीसाईबाबा सांगत की, संसारात कसे वागावे, तर वृक्ष जसा फळे आले की नमतो तसे, संपत्ती आली तरी गर्व न धरता नम्र व्हावे.

सत्याचे, माणुसकीचे, मानवतेचे, न्यायाचे, शांततेचे, समाजवादाचे, समानतेचे अमृत अखिल जगाला पाजणारे श्रीसाईबाबा हे एक दैवत आहे अशा एक

महान निष्काम कर्मयोगी सिद्ध अवतार श्रीसाईबाबांच्या चरणी माझे शतशः प्रणाम.

धन्य श्रीसाई तुझे चरण । धन्य श्रीसाई तुझे स्मरण ।
धन्य श्रीसाई तुझे दर्शन । जे कर्म बंधन मोचक ।।
साईचरणी अत्यंत भक्ती । नयनी कोंदो साई मूर्ती ।
साई दिसो सर्वांभूती । ऐसी ही स्थिती भक्ता येवो ।।

# साईंच्या समाधीची पासष्ट वर्षे

–श्री. वसंत वामन प्रधान
श्री गणाधीराज को. ऑ. हाऊसिंग सोसायटी, लि.
बि. नं. २, ब्लॉक नं. ९२, मिठागर रोड,
मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१.

त्रिकालज्ञ बाबा देह विसर्जनापूर्वी एकदा म्हणाले होते आता पुढे फार वाईट दिवस येतील व शिरडीला माझ्याकडे मुंग्यासारखी माणसांची रीघ लागेल. या विधानाची सत्यता आज आपल्याला जाणवली व जाणवत आहे. साधारण चाळीस वर्षांपूर्वीची शिरडीतील परिस्थिती सर्वच बाबतीत झपाट्याने बदलली. आज शिरडी हे खेडे राहिले नसून शहरी सुधारणेचे सर्वलाभ इथे उपलब्ध आहेत. शिरडीला येणारे असंख्य भक्त हा परमेश्वरी संकेताचाच परिपोष आहे. आज भक्तीमार्गात (काही अपवाद वगळता) लोक अधिक डोळस आहेत. पूर्वी क्वचित होणारे साक्षात्कार आज वाढले आहेत. त्यामुळे कथा, कीर्तने, प्रवचने समाजाला आवश्यक असणारी अंगे यांच्या संपर्काशिवाय सुद्धा माणूस श्री साईबाबांच्या चरणाजवळ भक्तीभावाने जात आहे, त्याला श्रींच्याकडून दिलासा मिळत आहे. श्रीसाईप्रेम भक्तांचे ठिकाणी निर्माण होत आहे ही सर्व श्रीसाईबाबांचीच किमया आहे. हे सर्व साईभक्त देशभर साईभक्ती करीत आहेत व अखिल भारत बहुतांशाने साईमय होण्याच्या मार्गावर आहे. यातील इंगित व लोकमताचा प्रवाह श्री साईबाबांच्या तत्त्वप्रणालीशी आकर्षित झाला आहे. साऱ्या भिन्न भिन्न समाजाला एकच देव पाहिजे म्हणजे सर्वांची मने एक व्हावी सर्व मानव समाज एकरूप व्हावा हा अर्थ अभिप्रेत आहे.

श्रीसाईनाथांनी देह विसर्जित केल्यास पासष्ट वर्षे पूर्ण झाली. या पासष्ट वर्षात धार्मिक, सामाजिक, राजकीय परिवर्तने झाली. ही तिन्ही परिवर्तने

एकमेकाशी निगडीत आहेत. श्रीक्षेत्र शिरडी येथे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात एक परमेश्वरी अवतार मानवी रूपाने अवतीर्ण झाला. ते श्री साईबाबा या नावाने परिचित झाले. त्या अयोनिज अनामिक परमात्म्याला बाराव्या शतकातील (श्री ज्ञानेश्वरमाऊलीचे धार्मिक व सामाजिक समतेचे कार्य) अपूर्ण राहिलेले कार्य पुरे करावयाचे होते. श्रीसाईबाबांच्या चरणाजवळ अति विद्वान तसेच गर्भश्रीमंत, सुखासिन जीवन जगणारे व राजकीय क्षेत्रातील अग्रगण्य दादासाहेब खापर्डे, ज्यांचा पुतळा अमरावती येथे राष्ट्रपतींच्या हस्ते उभारण्यात आला ते थोर पुरुष श्रीसाईबाबांचे तत्कालीन एकनीष्ठ भक्त होते व त्यांचे सहाध्यायी पूज्य लोकमान्य टिळक हे सुद्धा श्रींचे चरणाजवळ दोन वेळा येवून गेले. अनेक सरकारी उच्च पदस्थ त्यांचे भक्त होते. महाराष्ट्रात उदयास आलेला हा संत चूडामणि अखिल भारतीयच नव्हे तर अखिल जागतिक स्तरावर प्रकाशमान असून अनेक धर्मीय त्यांच्या त्यांच्या पंथाप्रमाणे श्रीसाईबाबांची उपासना करीत आहेत व त्याचे मूळ श्रींच्या अवतार कार्यातच आहे. ज्ञानेश्वर माऊलीचे कार्य व तत्त्वज्ञान व्यापक प्रमाणात जगभर रुजविण्यात श्रीसाईबाबांचा अवतार कारणीभूत आहे. 'हे विश्वची माझे घर ऐसी मती जयाची स्थिर, किंबहुना हे चराचर आपणची जाहला' (श्री. ज्ञानेश्वरी) आजच्या विज्ञान युगात मानवी जीवन जेवढे अस्थिर झाले तेवढे ते पूर्वी नव्हते. विज्ञानाने सारे जग जवळ आले परंतु भीतीने ग्रासलेला माणूस–माणसाकडे साशंकतेने पाहू लागला.

परंपरागत धर्म, देव यांच्या मर्यादा त्याला जाणवू लागल्या व अखिल मानवसमाज एकाच परमेश्वराच्या छत्राखाली एकसंघ दिसताच त्याना मानव्याचा खरा देव दिसला तोच 'अनंत कोटी ब्रम्हांड नायक श्रीसच्चिदानंद समर्थ सद्गुरु साईनाथ महाराज. हा देव 'मन्मनाभव मदभक्तो, मद्याजी मां नमस्कुरु.' व सर्व धर्मान परित्यज्य मामेकं शरणम्व्रज (भ. गीता) असे सांगत आहे त्याचप्रमाणे 'समता वर्तावी अहंता खंडावी (ज्ञा.) हे प्रात्यक्षिकाने दाखवित आहेत. प्रेम व बंधुभाव हेच सर्व धर्मांचे अंतरंग आहे ते कृतीशीलतेने श्रीबाबांनी ठसविले. परमेश्वर अखिल प्राणीमात्रांवर दया करतो त्याला भेदाभेद नाही. समोहं सर्वभूतेषू नमे द्वेश्या ममे प्रिय: (भ. गी.) हे श्री साईबाबांनी प्रत्यक्षात आचरून दाखविले. एकाच मातीच्या थाळीत कुत्री, मांजर, पशू, पक्षी या समवेत भाकर तुकडा खाऊन त्यांचेच उष्टे पाणी पिणारा हा देव सर्व प्राणीमात्रांच्या आत्म्याशी कसा एकरूप आहे हे स्वआचरणाने दाखविले. तसेच शय्याभूमीतलम दिशोपी वसनम् हा जीवनक्रम आचरून अधिकारी म्हणजे जाणकार व्यक्तींना तद्वीद्धी प्रणी पातेन परीप्रश्नेन सेवया उपदेक्षांती ते ज्ञानम ज्ञानी न स्तित्व दर्शना (भ. गीता) या श्लोकातील आत्मज्ञानाचा मार्ग एका नमस्कारात त्यांना अनन्य शरण जाण्यात दाखविला. प्रापंचिकांना त्यांची सांसारिक दुःखे निवारण करून मन:शांती दिली व परमेश्वरी उपासनेची गोडी लावली.

उच्चनीचता, वर्णाश्रम, जातीभेद, श्रीमंत, गरीब, सुशिक्षित अशिक्षित, ज्ञानी अज्ञानी, सर्व धर्मीय एकाच बैठकीवर आणले व सर्वांना जवळ करून विषमता कमी केली. या लेखातील विद्यमान परिस्थितीचा आढावा व आज आपल्याला समाजात जे जे चांगले दिसत आहे त्याचा उगम श्रीसाईबाबांकडे आहे. धर्म हा माणसाच्या उन्नत्तीकरता आहे, तो माणसा माणसामध्ये भेदाभेद करीत नाही. सर्वांची दुःखे निवारण करून माणूसकीची जपणूक करावयास लावणाऱ्या धर्माची कास धरा. कारण तोच ईश्वर प्रणीत धर्म आहे हीच बाबांची शिकवण. 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे'. (साने गुरुजी) परमेश्वरी उपासनेचे पंथ प्रत्येक धर्माचे वेगळे असले तरी ते व्यक्तीगत आचरून इतरांचे स्वातंत्र्य व मान राखावा याची शिकवण बाबांनी वेळोवेळी दिली.

धर्मा–धर्मातील व्यक्तींचे वैमनस्य हेच संपूर्ण अज्ञान आहे. परमेश्वराला ते कधीच मान्य नाही कारण त्यात मनुष्याचा अधःपात आहे हे सर्वार्थाने शिकविण्याकरिता श्रीसाईबाबांचा अवतार झाला. ती आजच्या युगाची गरज आहे. सर्व नद्या जशा समुद्राला मिळतात तशाच प्रकारे सर्वधर्म आप–आपल्या अनुयायांना परमेश्वराप्रत नेतात हीच श्री बाबांची शिकवण सर्व धर्मीयांना पटल्यामुळे ते श्री बाबांच्या आश्रयाला आले. दुसरी आजची सर्वात सामाजिक सुधारणा म्हणजे कुष्ठरोग्यांची सुश्रूषा व त्यांचे पुनर्वसन. महात्मा गांधींनी कुष्ठ रोग्याची (श्री परचुरे यांची) स्वतः जखमा धुवून शुश्रूषा केली. तेच कार्य फार मोठ्या प्रमाणात परमपूज्य श्री बाबा आमटे करीत आहेत व इतरही काही संस्था कार्यरत आहेत तरी या सर्वांचे मूळ श्रीसाईबाबांकडे आहे. कुष्ठरोगी श्री भागोजी शिंदे यांची श्रीबाबांनी स्वतः उपचार करून सेवा केली. त्यांचेकडे दलित, पीडित, उपेक्षित आश्रयाला येत व श्रीबाबा त्यांचे दुःख निवारण करीत, त्यांना जेवूखाऊ घालीत. आजही शिरडीमध्ये भोजन गृहात भेदाभेद पाळीत नाहीत व समाधी मंदिरात सर्व धर्माच्या लोकांना मुक्त प्रवेश आहे. श्रीसाईबाबांनी खादीची जाडी भरडी कफनी अंगात घातली, शिळेपाके जाडेभरडे अन्न खाल्ले जीभेचे चोचले पुरविले नाहीत. लोक संग्रह केला व आज राजकीय वा इतर प्रचाराने जे साधले जात नाही ते सर्व धर्म समभावाचे आचरण आज शिरडीत दिसत आहे. श्रीसाईबाबांचे वास्तव्य सर्व जगभर असल्याचे प्रत्ययास येत आहे तरीसुद्धा ज्या भूमीवर त्यांच्या मानवी पायांचे ठसे उमटले, जी भूमी त्यांच्या वास्तव्याने पवित्र झाली व सृष्टी क्रमानुसार ज्या भूमीत त्यांनी आपला देह ठेविला, त्याभूमीचे दर्शन घ्यावे, त्यांनी मानवी रूपात हाताळलेल्या वस्तूंना स्पर्श करावा, तेथील पवित्र हवा श्वासाने घेवून आपला देह पवित्र करावा, व अणूरेणूतून पाझरणारे भक्ती रसाचे झरे पहावे या उदात्त हेतुने भक्तांची मुंग्यासारखी रीघ लागत आहे. श्रीसाईच्या अलौकिक अवताराचे गूढ मनाला थक्क करणारे आहे जो जो त्यांना हृदयात साठविण्याचा प्रयत्न करावा तो तो विश्वव्यापी परमेश्वराचा साक्षात्कार घडून आपण भाव समाधीत जातो व परतत्त्वाचा आपल्याला स्पर्श होतो. आपण सर्वांनी साईमय व्हावे हीच श्रीसाईचरणी प्रार्थना.

# खालील भक्तांना साईबाबांचे दर्शन कोणाच्या निमित्ताने झाले ?

श्री. माधव गजानन गोरे
विनायक बाग,
बालाजी मंदिर मार्ग,
कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७०

१) काकासाहेब दीक्षित, भिमाजी पाटील ] – नानासाहेब चांदोरकरांच्या निमित्ताने

२) चोळकर, शेठ रतनशी पारशी ] – संत दासगणूंच्या निमित्ताने

३) मेघा – रावबहादूर साठेंच्या निमित्ताने

४) सपटणेकर – श्री शेवडेंच्या निमित्ताने

५) काकाजी वैद्य – सप्तश्रृंगी देवीच्या निमित्ताने

६) सोमदेवस्वामी – भाईजी दीक्षितांच्या निमित्ताने

७) भाई – अक्कलकोटचे स्वामी समर्थ

८) मुळेशास्त्री – श्रीमंत बापूसाहेब बुटींच्या निमित्ताने

९) मालेगावचे डॉक्टर – त्यांच्या पुतण्याच्या निमित्ताने

१०) गोव्याचे गृहस्थ – एका फकिराच्या निमित्ताने

११) आप्पासाहेब कुळकर्णी – बाळासाहेब भाटे यांच्या निमित्ताने

१२) धरमसी जेठाभाई ठक्कर – काकासाहेब महाजनींच्या निमित्ताने

# श्रीसाईबाबांचे महानिर्वाण

—सौ. मंगला सु. वैद्य
द्वारा सुभाष अनंत वैद्य
भारतीय स्टेट बैंक,
झाबुआ, (म. प्र.) ४५७ ६६१

श्री समर्थ रामदास स्वामींनी म्हटले आहे, **"जे जे दिसेल ते ते नासेल॥" "ह्या जगात काहींच शाश्वत नाहीं।"** हा संदेश अनेक संतांनी वेळोवेळी दिला आहे. परंतु तेल संपल्या नंतर दिवा विझतो व कळी देखील फूल बनल्या नंतर काही वेळाने वाळून जाते. तरीपण जीवन असेपर्यंत समाजाला प्रकाश व सुगंध दिल्याचे समाधान त्यांना असते व म्हणूनच त्यांचे नश्वर जीवन ही सार्थक होते. आपण सामान्य माणसं, आपल्या जवळील कोणतीही वस्तु हिरावून घेतली गेल्यास आपणास वाईट वाटते मग ती वस्तु म्हणजे निव्वळ मातीचे खेळणें कां न असो. तर सुमारे ६५ वर्षपूर्वी शके १८४० मध्ये विजया दशमीस जेव्हां काळाने भक्तांपासून त्यांचा जीवनाधार असलेले श्रीसाई यांस दूर नेले तेव्हां त्या भक्तांना किती वाईट वाटले असेल त्याची केवळ कल्पना करणेच शक्य आहे.

**"की घरधन्यावीण घर । की राजयावीण नगर'**
**की द्रव्यावाचून भांडार । शिरडी कांतार बाबावीण॥"**
**"महाराजांचे देहावसान । प्राणांतची ओठविला ग्रामस्थापूर्ण ।**
**म्हणती देवा हा प्रसंग दारूण । हृदय विदारण झाले गा।"**
**"कोणी करी आक्रंदन । कोणी तेथे घेई लोळण**
**कोणी पडे मूर्च्छापन्न । दुःखापन्न जन झाले ।"**

हे श्री दाभोलकर रचित श्रीसाई सच्चरितात केलेले वर्णन अगदी यथार्थ वाटले. दुःखाची चरमसीमाच त्यावेळी भक्तांनी अनुभवली असली तरी ही काहीं विचारवंत स्थिरमनाने विचार करत होते. कारण ते पूर्णपणे जाणत होते की बाबांनी हा देह वस्त्राप्रमाणे बदलला आहे. अन्यथा श्रीसाई ही नष्ट होणारी वस्तु नव्हे. कारण —

**"रवीस लागले ग्रहण । झाला की हो खग्रास पूर्ण ।**
**हा तो केवळ दृष्टीचा दोषगुण । संतासी मरण तैसेच ।**

श्रीसाई हे व्यक्त होते, ते अव्यक्त झाले एवढेच कारण केवळ लोक कल्याणार्थ त्यांनी अवतार घेतला त्यावेळी हिंदु यवनांत द्वैत निर्माण होऊन संपूर्ण समाजाची घडी विस्कळीत झालेली होती व सर्वदूर अधर्माचरण चालू होते. आपल्या देशात पूर्वी झालेल्या इतर संताप्रमाणेच बाबांनी ही समाजाचा उद्धार करण्यास्तव अवतार घेतला व ते कार्य पूर्ण होताच स्वइच्छेने अवतार संपविला.

श्रीसाईबाबांनी समाजाला व्यावहारिक ज्ञान दिले व त्याचे प्रत्यक्ष प्रयोग करून दाखविले. मरण जवळ असतांना श्री वझे नामक ब्राम्हणांकडून 'राम-विजय' हा ग्रंथ वाचवून घेतला. लक्ष्मीस नवदान दिले व अंतीम समयी भक्तांस जेवणाच्या निमित्ताने दूर सारले. वेळी मोहास दूर कसे सारावे हे ह्या उदा-हरणावरून कळून येईल. श्रीबाबांनी **"वाडियात पडो हे शरीर"** ही इच्छा व्यक्त केली होती त्यातही समाजहित दिसून येईल. कारण त्या स्मारकामुळेच (अनेक अलग अलग धर्मांचे) भक्त एका विशिष्ट स्थानी जमतील, एकमेकांस प्रेमपूर्वक भेटतील व मिळून भक्ती करतील म्हणजे समाजात एकी निर्माण होईल व ते स्थान अनेकानेक भक्तांचे दुःख व चिंता दूर करून त्यांस सुखी व समाधानी बनवेल, तरी भक्त हो —

**"देह आहे उसनवारी । पंचमहाभूतांची सावकारी ।**
**निजस्वार्थ (परमार्थ) साधल्यावरी ।**
**परतणे माघारी । ज्याची त्या ॥"**

हे लक्षात घेऊन बाबांची निस्वार्थ भक्ती करणे हेच आपणासर्वांचे जीवन ध्येय आहे. त्यासाठी श्रीबाबांचे पूर्ण सहाय्य आपणास आहेच. बाबा म्हणतात —

**"नित्य मी जीवंत जाणा हेचि सत्य ।**
**नित्य घ्या प्रचीत । अनुभवे ॥"**

★

# श्रीसाईनाथ कोटीप्रणाम

—श्री. गणपतराव सामंत, एम्. ए.
व्यवस्थापक — श्रीमहालक्ष्मी मंदिर.
मुंबई ४०० ०२६

० श्रीसाईनाथांनी समाधिस्त होण्यापूर्वी बत्तीस वर्षे अगोदर ब्रम्हांडी तीन दिवस आत्मा चढविला हे सर्व भक्तांना ठाऊक आहेच. पण यातील अर्थ व गुपित मला वाटते अजून अज्ञात आहे. जे काय ठाऊक असेल ते चार–चौघा भक्तांनाच. अनेक ग्रंथ प्रसिद्ध होत आहेत पण खालील गोष्ट अजून प्रसिद्ध झालेली नाहीं. सर्व भक्तांना महत्त्व कळावे म्हणूनच हा लेख प्रसिद्ध होत आहे.

**काळाच्या माथां देणार पाय ।**
**ऐसिया महात्म्यांचा आयुर्दाय ।**
**करवेल कधी निश्चित काय ।**
**अवघड हे कार्य साधाया ॥**

सिद्ध सत्पुरुषांना कालमर्यादा नसते. ते चिरंजीव असतात किंवा ईच्छा-मरणी असतात. श्रीसाईनाथ हे दत्तावतारी नाथ संप्रदायी सत्पुरुष आहेत.

आदिनाथ (श्रीदत्तात्रेय) गुरु सकल सिद्धांचा नाथ पंथाची परंपरा श्री-दत्तात्रेयापासून सुरु झाली. दत्तात्रेय, मच्छिंद्र, गोरक्ष, कानिफ, जालंदर इत्यादि नाथ संप्रदायी सत्पुरुषांच्या परंपरेत श्रीसाईनाथांचे स्थान आहे. नवनाथ चिरंजीव असून त्यांचे कार्य चालूच आहे. म्हणूनच श्रीसाईनाथ होऊन गेले म्हणण्यापेक्षा श्रीसाईनाथ आहेत असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. तसे अनुभव असंख्य भक्त आज घेत आहेत.

श्रीसाईनाथांचा कालावधि ऐंशी वर्षांचा म्हणजे शके १७६०–१८४० (इ. स. १८३८ – १९१८) आहे.

**शके अठराशे चाळीस ।**
**आश्विन शुद्ध दशमीस ।**
**विजयादशमीचे सुमुहूर्तास ।**
**बाबा निजवास पावले ॥**

**एवं ऐशींचा आयुर्दाय ।**
**स्थूलमानाचा हा निश्चय ।**
**की शके सतराशे साठ होय ।**
**जन्म निर्णय बाबांचा ॥**

म्हणजे मानवी देहात श्रीसाईनाथांनी ऐशी वर्षे आत्मा ठेवला. समाधिस्थ होण्यापूर्वी बत्तीस वर्षे अगोदर त्यांनी शरीर सोडून आत्मा ब्रम्हांडी चढविला तो तीन दिवस.

**मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा ।**
**बाबा अस्वस्थ उठला दमा ।**
**सहन करावया देहधर्मा ।**
**ब्रम्हांडी आत्मा चढविला ॥**

मार्गशीर्ष पौर्णिमा (श्रीदत्त जयंती) इ. स. १८८६ मध्ये श्रीसाईनाथांनी आत्मा ब्रम्हांडी चढविला.

मार्गशीर्ष पौर्णिमा किंवा वैशाखी पौर्णिमेस नवनाथ व इतर नाथपंथीय सिद्धांचे सम्मेलन असते. व अशाचवेळी दम्यामुळे शरीर त्रस्थ झाल्यामुळे म्हाळसापतीस सूचना देऊन श्रीसाईनाथांनी ब्रम्हांडी तीन दिवस प्राण चढविले. पण तीन दिवसानंतर त्याच कष्ट होणाऱ्या शरीरात नवीन सिद्ध नाथांनी प्रवेश केला श्रीसाईनाथांनी नव्हे. यानंतर श्रीसाईनाथांचे बत्तीस वर्षे कार्य चालू राहिले.

मंगळवार दि. १५–१०–१९१८ रोजी दुपारी २ वा. ३५ मि. श्रीसाईनाथांनी शरीर त्याग केला व समाधिस्त झाले. मुसलमानी कॅलेंडरप्रमाणे त्यादिवशी नऊ तारीख असून कत्तलची रात्र होती.

समाधिस्त होण्यापूर्वी चार महिने अगोदर श्रीसाईनाथांनी कासीम नावाच्या मुलास औरंगाबादेतील बन्नेमिया नावाच्या फकिरास हार पाठविला व निरोप दिला –

**'नव दिन, नव तारीख, अल्लामिया अपना धुनिया ले जायेगा. मर्जी अल्लाकी'.**

बन्नेमियांच्या गळयात श्रीसाईनाथांनी दिलेला हार पडताच त्यांनी हवेत उंचावलेला हात हळुहळू खाली आणला व श्रीसाईनाथांचा वरील निरोप ऐकताच बन्नेमियांच्या डोळयांतून अश्रू ओथंबले. चार महिन्यांनी बाबा समाधिस्त झाले. (स्वामी साईशरणानंद व श्री. वि. बा. खेर यांच्या पुस्तकावरून)

**शके अठराशे चाळीस । दक्षिणायन आश्विनमास ।**
**विजयादशमी शुक्लपक्ष । पावेल अक्षयपद तात्या ।।**

असे भाकित सांगून —

**पहा आतां बाबांची वाणी । नाव दिधले तात्यांचे लावूनी ।**
**केली तयारी निजप्रयाणी । वेळा न चुकवनी अणुभर ।।**

श्रीसाईनाथांचे समकालिन व त्यांचे सान्निध्य लाभलेले व सध्या अस्तित्वात असणाऱ्या सिद्धसंतांकडून बाबांच्या तीन दिवस ब्रम्हांडी प्राण चढविण्याचा हेतु कळला. नाहीतर अभ्यास करून अशी माहिती मिळू शकणार नाहीं. नेहमी साईबाबां विषयीच बोलणे, साक्षात् ईश्वर म्हणजे साई असे म्हणणारे असे हे सत्पुरुष की ज्यांचा नामनिर्देश त्यांच्या परवानगीशिवाय करता येत नाही. त्यांच्या सहवासात श्रीसाईनाथांचा सहवास मिळाल्यासारखा वाटतो. असा माझा व अनेकांचा सत्य अनुभव आहे. श्रीसाईनाथांच्या अस्तित्वाची जाणीव होते.

**संत मुळीच गर्भातीत ।**
**परोपकारार्थ प्रकट होत ।**
**ब्रम्हस्वरूप मूर्तिमंत ।**
**भाग्यवंत अवतरती ।।**
**जन्म आणि मरणस्थिती ।**
**अवतारी यां कदा न येती ।**
**कार्य सरतां ते स्वरूपी मिळती ।**
**समरसती ते अव्यक्ति ।।**
**अवघा देह साडेतीन हात ।**
**बाबा काय त्यांतचि समात ।**
**ते विशिष्ट वर्णस्वरूप युक्त ।**

हे तो अयुक्त बोलणे ।।
ऐसिया महानुभवांचा उदय ।
लोक कल्याण हाचि आशय ।
उदयासी आहे स्थिती विलय ।
लोक संग्रहमय संत ।।

तीन दिवस आत्मा बाहेर ठेऊन नवीन नाथांच्या रूपाने बाबांनी शरीरात प्रवेश केला. यात आणखी बराच अर्थ असणारच.

शरीर अवजड झाले, गलितगात्र झाले की आत्मा बाहेर पडून नवीन देहात प्रवेश करतो. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे –

वासांसि जीर्णानि यथा विहाय ।
नवानि गृहणाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णा –
न्यन्यानि संयाति नवानि देहि ।।

ज्याप्रमाणे मनुष्य जुनी वस्त्रे टाकून नवी वस्त्रे धारण करतो त्याप्रमाणे जीवात्मा जुने व निरुपयोगी शरीर टाकून नवीन शरीर धारण करतो.

दम्यामुळे त्रस्त झालेले शरीर श्रीसाईनाथांनी सोडले पण त्याच शरीरात नवनाथाच्या रूपाने प्रवेश केला व आपले कार्य चालू ठेवले. वरील घटना भगवद्गीतेतील वचनास अपवाद ठरली. केवढे हे बाबांचे सामर्थ्य.

श्रीसाईनाथांच्या महानिर्वाणाला येत्या विजयादशमीला ६५ वर्षे पूर्ण होतात. सर्व साईभक्तांना अनेक प्रकारे बाबांच्या अस्तित्वाची प्रचिती येते यावरून बाबा जरी देहधारी नसले तरी त्यांचे वास्तव्य असल्याची जाणीव येते. देहधारी नाहीत असे म्हणणे चुकीचे ठरेल कारण

**"आठा वर्षांचा बाळ जनी । पुन्हा येईन मागुतेनि ।**

ही त्यांची वाणी आहे. काहीही असो आज त्यांचा संचार सर्वत्र चालू आहे. व याची प्रचिती असंख्य भक्त घेत आहेत.

श्रीसाईबाबा पंचषष्ठि महानिर्वाण दिनी बाबांना कोटी कोटी प्रणाम.

# श्रीबाबा आणि दक्षिणा

सौ. उषाताई अधिकारी
सावित्री सदन, बंदर रोड, रत्नागिरी.

० घरोघरी देवदेवतांची पूजा चालते. गंध, कुंकू, अक्षता, फुले, हार घातले जातात, निरांजन ओवाळले जाते, नैवेद्य दाखवला जातो आणि आपल्या परम दैवताला विडा–दक्षिणा अर्पण केली जाते. प्रभू साईनाथ शिरडीत प्रकट-ल्यानंतर लोक त्यांना वेडा फकीर समजत, त्यांची चेष्टाही करीत. पण जेव्हां त्यांची योग्यता कळली तेव्हां त्यांच्या दर्शनार्थ भक्तांच्या झुंडीच्या झुंडी येऊ लागल्या. श्रीबाबांचे दर्शन हा त्यांना परमोच्च आनंद वाटे. बाबांशी प्रेमाने बोलावे, हसावे, त्यांच्याजवळ गोष्टी बोलाव्यात, त्यांचे ते लोभस रूपडे परत परत पहावे. असे त्यांना वाटे. श्रीसाईबाबा हाच आपला एकमेव आधार आहे ह्या दृढ श्रद्धेने त्यांचेवर भार ठेऊन रहावे. सदा आनंदात असावे. सुखाने ते या सगुण रूपाची भक्ती करीत होते. श्रीबाबांना आपल्या भक्तांची पूर्ण काळजी होती. ते भक्तांकडून हरतऱ्हेची सेवा करून घेत होते ती घेता घेता दक्षिणेची मागणी करीत होते.

दक्षिणेचेही दोन प्रकार आहेत (१) व्यावहारिक दक्षिणा, (२) आध्यात्मिक दक्षिणा. देवदर्शनाला जातांना कुणीही रिक्त हस्ते जात नाहीं आपल्या कुवतीप्रमाणे काहीना काही घेऊन जातच असते. कोणी पेढे, बर्फी, नारळ तर कुणी फळफळावळ घेऊन जातो. कुणी पैसेही देतो. हे जे पैसे दिले जातात त्याला व्यावहारिक दक्षिणा असे म्हणतात. मात्र जेव्हां सद्‌गुरु शिष्याला मंत्र-प्रदान करतात तेव्हां शिष्य सद्‌गुरुची मनोभावे पूजा करून जे द्रव्य देतो ती आध्यात्मिक दक्षिणा होय.

बाबा दक्षिणा मागत पण सर्वांकडून नव्हे. भक्तांची अनुकूलता व इच्छा, भाव, भक्ती पाहूनच मागत. यात स्त्रिया व मुलांचाही समावेश असे. श्रीमंत, गरीब हा भेद त्यांचेजवळ कधीच नव्हता. दक्षिणेतील काही रक्कम ठेऊन घेऊन काही परत देत म्हणत, याचा नीट सांभाळ करा. काहीं वेळा भक्तांनी दिलेली दक्षिणा अपुरी वाटून ते अधिक मागत. अशा तऱ्हेने रोज जे चार–पाचशे रुपये जमत त्यापैकी स्वतःसाठी एक कपर्दिकही खर्च न करता कोणास

१०–१५, २०–५० याप्रमाणे वाटून टाकीत. यात तात्या पाटलां सारखा श्रीमंत गृहस्थ असे आणि भाग्या सुंदरी यासारखी दरिद्री माणसेही असत. ऐतखाऊ बडेबाबांना तर रोज ५० रु. मिळत असत. श्रीबाबा दक्षिणेच्या रूपाने भक्तांची परीक्षा पहात असत. याची अनेक उदाहरणे आहेत. (१) काशिराम शिंपी – याच्याकडून वारंवार दक्षिणा घेऊन त्याला कफल्लक, कर्जबाजारी बनविले पण हे करताना त्याचा 'मी बाबांना रोज दक्षिणा देतो' हा जो अहंकार होता त्याचे दहन केले. शेवटी तो शरण येताच त्याची आर्थिक स्थिती सुधारली. (२) गणपतराव बोडस – नटवर्य गणपतराव बोडसांनी एकदा दक्षिणा दिली ती पुरली नाहीं म्हणून पुन्हा पुन्हा मागून त्यांना निर्धन केले. परंतू श्री. बोडसांना आयुष्यात कधीही काही कमी पडले नाहीं. (३) दासगणू – दासगणूंचे पहिले गुरु वामनशास्त्री इस्लामपूरकर यांनी फक्त कडोसरीचे २ पैसेच दक्षिणा घेतली होती. पण बाबांनी त्यांच्या सबंध नोकरीचीच दक्षिणा घेतली तीही अनेक परीक्षा घेऊन पण ती घेतल्यानंतर त्यांना आध्यात्मिक मार्गात उच्चस्थानी नेऊन बसविले. (४) बाळकृष्ण देव मामलेदार – यांचेकडे एकाच दिवसात ३ – ३ वेळा दक्षिणा मागितली. त्यांनी ती श्रद्धापूर्वक दिली. ती घेताना अनेक प्रकारे परीक्षा घेऊन त्यांना मारण्यापर्यंत मजल नेली, शिव्याशापांचा वर्षाव केला पण नंतर त्यांचेवर पूर्ण अनुग्रह करून त्यांचेकडे भोजन केले व ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचण्याची स्वतः दिक्षा दिली. (५) श्री. बाबासाहेब तर्खडांच्या मित्राची पत्नी – ही शिरडीस आली असता तिच्याकडे ६ रु. मागितले. तिच्या जवळ पैसे नव्हते. ती घाबरली पण तिच्या पतीने त्या ६ रु. चा अर्थ जाणला व तो तिला म्हणाला, "अग बाबा तुला षड्रिपूवर विजय मिळव असे सांगतायत". बाबांनी यावर हसून मान डोलावली व त्या स्त्रीच्या मस्तकावर आपला अभय-हस्त ठेवून तिला छळणारी डोकेदुखी कायमची बंद केली. (६) गणेशभक्त श्री. त्रिंबक विठ्ठल सामंत यांनी बाबांनी न मागताच २ रुपये दक्षिणा दिली पण त्यांचेजवळ झगडा करून आणखी २ रू. देच.' असे म्हणून ते वसून केले. (७) काका महाजनी – हे शिरडीस गेले की आपणहून बाबांना दक्षिणा देत एके प्रसंगी त्यांच्या पेढीचे मालक धरमसी जेठाभाई त्यांचेबरोबर गेले असता त्यांचे समोर बाबांनी फक्त काकांजवळच दक्षिणा मागितली त्यांनी ती देताच श्रीबाबा म्हणाले, "काका, अरे मी एकपट घेतो पण मला दसपट हजारपट द्यावे लागते " हे बोल ऐकून धरमसीनी स्वतःहून बाबांना १५ रु. दक्षिणा दिली. (८) गोमंतकातले २ गृहस्थ – हे दोघे श्रींच्या दर्शनास आले असता एकाजवळ १५ रु. दक्षिणा मागितली पण दुसरा आपणहून ३५ रु. देत होता

तरी ती घेतली नाही. ही विषमता पाहून माधवरावांनी हा भेद का असा प्रश्न केला तेव्हां बाबा म्हणाले, "अरे श्यामा, मी मागणारा कोण? ऋण, वैर, हत्या कुणाला चुकत नाही. मशीदमाई आपले येणे वसूल करीत आहे. हा १५ रु. देणारा तिचा ऋणी आहे म्हणूनच मी त्याचेजवळ ते मागितले. (९) माधवराव देशपांडे – श्रीबाबांचे निःस्सीम भक्त. फार प्रेमातले. सख्य भक्तीचा उत्तम नमुना. श्रीसाई सच्चरितकार गोविंदराव दाभोलकर यांचेमार्फत बाबांनी माधवरावांकडे १५ रु. दक्षिणा मागितली त्यांनी तेव्हां द्वारकामाईकडे तोंड करून मनोभावे १५ नमस्कार केले व हीच दक्षिणा असे ते म्हणाले. अर्थातच ही दक्षिणा बाबांना मान्य झाली. (१०) मुळे शास्त्री – षट्शास्त्रात निपुण, प्रख्यात ज्योतिषी घोलप स्वामींचे भक्त. शिरडीत आल्यावर बापूसाहेब बुटींना त्यांचेकडे पाठवून श्रीबाबांनी दक्षिणेची मागणी केली मुळेशास्त्री रागारागानेच आरतीच्या वेळी दक्षिणा घेऊन आले. सोवळे म्हणून लांब उभे राहिले. त्यांची त्यांच्या गुरुस्थानी असलेली पूर्ण श्रद्धा पाहून बाबांनी त्यांना घोलप स्वामींच्या रूपात दर्शन दिले तेव्हां हर्षातिरेकाने मुळे शास्त्र्यांनी बाबांना मिठी घातली व दक्षिणाही दिली (११) रतनजी पारसी – पुत्रसंतान नसलेला हा गृहस्थ नांदेडहून मुद्दाम दर्शनाला आला त्यांचे जवळून ३ रु. व ४ आणे वजा करून राहिलेली दक्षिणा घेऊन आपण व मौलीसाहेब हे एकच हे पटवून दिले व त्यांची पुत्रकामना पूर्ण केली. (१२) श्री. खापर्डे – यांचे घरी रात्री भोजनास गेले. नंतर विडा खाल्ला. खापर्ड्यांना ते स्वप्न वाटले पण दुसऱ्या दिवशी माझी कालची दक्षिणा दे असा आग्रह करून दक्षिणा मागून घेतली. (१३) श्री. सपटणेकर – यांची विविध प्रकारची परीक्षा घेऊन त्यांचेवर अनुग्रह केला. निघताना त्यांचेजवळ २ रु.च होते. त्यांचा तेवढाच देण्याचा संकल्प जाणून तेवढीच दक्षिणा मान्य करून घेतली. १४) शिरडीचे साईबाबा या पुस्तकाचे लेखक श्री. केशव भ. गव्हाणकर – यांचेकडूनही २ पैसे दक्षिणा मागून घेतली आहे व ती त्यांनी दिली आहे.

श्रीबाबांनी सरसकट सगळ्याच भक्तांकडून दक्षिणा घेतली नाही तरी सेवेच्या रूपाने ती निश्चितच वसूल केली आहे यात विरागी म्हाळसापती आहेत, काकासाहेब दीक्षित आहेत. त्यांचेकडून आध्यात्मिक मार्गाने प्रगती करून दक्षिणा घेतली. श्री. साठेसाहेब श्री. काकासाहेब दीक्षित, श्रीमंत बुटी यांचेकडून वाडे बांधून घेतले त्यांना त्या रूपाने चिरंजीव केले पण हीही एक प्रकारची जनसेवेची दक्षिणाच. तात्या कोते पाटील, गोपाळ गुंड यांचेकडून जुन्या देवळांचे

जीर्णोद्धार करून घेतले. नानासाहेब चांदोरकरांकडून ठिकठिकाणी फिरण्याचे निमित्ताने आपण कोण हे वदविण्याची कामगिरी करून घेतली. लोकांना जेवणाची सोय, रहाण्याची सोय करून घेतली. ही पण दक्षिणाच. भीष्म, दासगणू यांचेकडून राम–जन्मोत्सवाची कीर्तने, दासगणूंकडून सर्व संत चरित्रे लिहून घेतली ही पारमार्थिक दक्षिणाच होय. नानासाहेब निमोणकर, तात्यासाहेब नूलकर, माधवराव देशपांडे यांचेकडून लोकसेवा करून घेतली ही दक्षिणाच. राधाकृष्णा आई, बाळा पाटील नेवासकर यांचेकडून रस्ते झाडण्यापासून तो सारवण वगैरे घालून घेण्याचे काम करून घेतले ही ही दक्षिणाच. बापूसाहेब जोग, प्रेमळ भक्त मेघा यांचेकडून देवांची पूजा व आरती करून घेतली हाही दक्षिणेचाच प्रकार. निरनिराळ्या प्राण्यांच्या रूपात तर्खडांच्या पत्नीसारख्या स्त्रियांना दर्शन देऊन त्यांच्यात भूतदया किती आहे हे पाहिले व त्या परीक्षेत त्या उतरल्या ही पण दक्षिणाच होय.

ह्या दक्षिणा घेण्यात त्यांचा हेतू तरी काय होता? याचे एकच उत्तर. भक्तांना त्यांच्या पूर्वजन्मीच्या ऋणातून मुक्त करणे, त्यांची आध्यात्मिक उन्नती करणे, त्यागी वृत्ती निर्माण करणे. 'दिल्यावाचून मिळत नाहीं.' ही उदात्त शिकवण त्यांचे मनावर बिंबवणे ही आहेच पण त्याशिवाय आपल्या भक्ताची वित्तावरची आसक्ती सुटली आहे की ती अंशतः तरी कमी झाली आहे की नाही हे पहायचे असेल. दक्षिणा मागितली तरी भक्त जवळ राहातो की आपल्यापासून दूर होतो हे ही त्यांना पहायचे असेल. ते काही असो. श्रीबाबांनी दक्षिणा मागितली ती संध्याकाळच्या आत सर्व वाटून ते मोकळेही होत असत. त्यांनी कसलाच संग्रह केला नाहीं. दक्षिणा न देणाऱ्याचीही त्यांनी कधीच उपेक्षा केली नाही. उलट भक्तांवर अलोट ममता प्रेम केले.

**असा आमुचा साई परमेश्वरी अवतार**
**त्याचे चरणी मागते कधी न पडो विसर ॥**



# साईबाबांचा महानिर्वाण दिन

—कु. सरल प. खारकर.
'साई निवास' प्लॉट नं. ३६ ए पूर्व,
ब्लॉक नं. ४, पहिला माळा, सा. हौ.
सोसायटी, शीव, मुंबई २२.

० दसऱ्याच्या दिवशी श्रीसाईबाबांची पुण्यतिथी म्हणजेच महानिर्वाण दिन समजला जातो. यंदा वडील मंडळी श्री साईबाबांचा पासष्टवा महानिर्वाण दिन आहे असे सांगतात. परंतु बाबा सर्वत्र आहेत. ही सृष्टी त्यांच्या अस्तित्वाने व्यापून राहिली आहे. श्रीबाबांनी माणूसकी ही जात आहे. मानवता हा धर्म आहे ही मानवाला शिकवण दिली. श्रद्धा, सबूरी हा अमोल मंत्र दिला. उदीच्या रूपाने संजीवनीचा लाभ सर्वांना दिला आहे. बाबा हे निरंतर आपल्या जवळच आहेत. श्रीबाबांनी देहानी सीमोल्लंघन केले असले तरी ते सगळ्यांच्या हृदयात प्रेमाने वास करून राहिले आहेत. बाबांच्यावेळी जी मंडळी त्यांच्या सहवासात आली ती धन्य धन्य होत. बाबांनी आम्हांला दान धर्म करण्याची सवय लावून दिली. बाबांना काय कमी होते? कुबेराचे भांडारसुद्धा कमी पडले असते. पण बाबा स्वत: घरोघरी जाऊन भिक्षा गोळा करीत. माणसांजवळ पुष्कळ असले तरी ते दुसऱ्यांना सत्पात्री दान करण्याची इच्छा हवी. बाबा तुमची ती ११ वचने त्यांचा प्रत्यय तर वेळोवेळी येतो. बाबा संकटाच्या वेळी जशी तुमची आठवण होते तशी आनंदाच्या क्षणी तुमचे कधीही विस्मरण होत नाही. बाबा तुम्ही आम्हांला धीर देता. तुमच्या फोटोचे दर्शन घेता मनातील दुःख हलके होते. पशु, पक्षी, वृक्ष, लता यावर प्रेम करून मायेने त्यांची जोपासना करावी व प्रेम करावे. हे तुम्ही आचरणात आणून आम्हांला शिकवण दिलीत. श्रीराम नवमीचा उत्सव सुरू करून एकात्मतेची शिकवण दिलीत. आज जगाला त्याचीच गरज आहे. त्याचीच उणीव सर्वत्र दिसत आहे. श्रीसाईबाबा देहाने जरी गेले असले तरी कीर्ती रूपाने सर्व भक्तांसाठी धावून येतात. त्यांच्या पाठीमागे मायमाऊली होऊन संकटाचे हरण करतात. श्री साईबाबांच्या नामाने मन प्रसन्न होते. मी आहे विद्येने धाकुली मज सांभाळूनी घ्या आपुली. या महानिर्वाण दिनी मी आणखी काय लिहू? शब्द अपुरे पडतात. शब्दांच्या पलिकडचे आहे. तुम्ही साक्षात् भगवान आहांत. श्रीसाईबाबा तुम्हांला आम्हां भावंडांचे कोटी कोटी प्रणाम.

# पुण्य–स्मरण

–श्री. त्रिबक द. चाचक
अशोक भुवन, नवापाडा,
डोंबिवली (पश्चिम).

० श्री साईनाथांना समाधिस्थ होवून आता ६५ वर्षे झाली. गेल्या काही वर्षात त्यांच्या भक्तांच्या संख्येत अनेक पटीने वाढ झाली आहे. ह्या संख्येचे प्रमाण ठरविणे जवळ जवळ अशक्यच.

पूर्वी आम्ही शिर्डीला जात होतो, तेव्हा मन अत्यंत करुणतेने भरून यायचं. तेथे रहात असताना, सर्व प्रकारे साईनाथांचेच विचार डोक्यात असत. सकाळी, दुपारी अगर संध्याकाळच्या धूपारतीच्या वेळी साईनाथांच्या मूर्तीमध्ये अचानक भाव उमटलेले आम्हांस जाणवत असत त्यांचा चेहरा आम्हांला जे काही समजावून सांगायचा ते लिहिणे, कठीणच. आम्ही त्या समाधिसमोर त्यांच्या मंगलमूर्तीकडे पहात असताना आमच्या मनात असे विचार येत की, 'साईनाथा तूच आम्हांला मोठं केलस. आमचे आईवडील जरी रक्ताचे असले तरी आमचे मन तूच घडविलेस. तूच योग्य ती बुद्धि दिलीस, तूच खराखुरा परमेश्वर आहेस. आम्ही असे सांगतो की, आम्ही आयुष्यात कोणाचेही वाईट चिंतणार नाहीं. कोणालाही वाईट वागणूक देणार नाहीं. इतकच काय पण जीवनात खोटेपण बोलणार नाहीं. असे म्हणत साईनाथांना नमन करीत असू.

ज्या दिवशी आम्हांला परत घरी यावयाचे असेल तेव्हा आमची मानसिक स्थिती विचित्र होत असे. त्या दिवशी आरत्यांच्या वेळेस मन करुणतेने भरून जायचे व डोळ्यातून अश्रू ओघळायचे. हीच स्थिती पुन्हा शिर्डीस गेल्यावर व्हायची. मन शांत व्हायच, कारण साईश्वरानेच माझे आयुष्य घडविले होते. माझे मन, माझे विचार ह्या सर्वांना साईनाथ साक्षीदार असत. किंबहुना तेच कारणीभूत असत. हा देव सर्वस्वी माझाच असायचा कारण बदलत्या आर्थिक परिस्थितीलाही ह्याच परमेश्वराचे विचार उपयोगी पडत असत. जगाची प्रचंड उलाढाल आम्ही विसरत असू हा देव व आम्ही बस्स्. और कुछ नहीं.

पण आता परिस्थिती बदलली का मी बदललो हेच समजत नाही. शिर्डीला मन शांत होण्यासाठी जे पूर्वी वातावरण होते ते आता तिथं नाही अस वाटतय.

शांत शिर्डी आता कधीच शांत नसते. माझ्यासारखे अनेक भक्त आता थोडे अस्वस्थ असतील कारण, शिर्डीला आता प्रचंड गडबड, भरपूर गर्दी, ह्यामुळे आता समाधिसमोर काहीकाळ शांत उभं रहाताच येत नाहीं. मन स्थिर होत नाही. कारण मनाची स्थिरता येण्यासाठी सर्वांजवळ एकच विचार हवा. तोच कदाचित नसेल, तरीसुद्धा मला माझ्यात बदल करून घ्यायला हवा कारण –

'बदल ह्या सृष्टीत आवश्यक असतात आणि ते होणारच'.

पण माझ्या मनाचं काय? तसेच नवीन भक्तांचे काय? आम्ही ज्या गोष्टीचा साईनाथांच्या प्रेरणेने अनुभव घेतला, तो अनुभव, त्या गोष्टी नव्या भक्तांना कशा अनुभवता येतील? व्यवहारी जगातील माणूस व्यवहार समोर ठेवून जर भक्ती करील तर त्याला मनःशांती कशी लाभणार? अशी विचित्र शंका मनात येते, तरीसुद्धा माझा विश्वास आहे की, हा साईश्वर त्या भक्तांना एक ना एक दिवस खऱ्या भक्तीकडे वळविणारच. त्याचेही मन स्थिर करणार.

आणि यदाकदाचित् काही भक्त तसेच राहिले तर? तर ते साईनाथांना दोष तर देणार नाहीत ना? कारण अशा भक्तांची संख्या बरीच असते नाही? पण तसे होणार नाही, कारण सर्वसामर्थ्यानिशीच श्री साई शिर्डीत अवतरले होते, त्यांनीच महामंत्र दिलाय की, अव्वल बादशाहीपेक्षा गरीबीच चांगली, आणि हेच ते भक्तांना पटवून देतील व तेसुद्धा ह्या मंत्राने भारावतील.

साईनाथांनी दिलेला महामंत्र आपण जर पाळू तर खरोखर आपणासारखा सुखी कोण?

गरीबी, सत्यता, प्रामाणिकपणे अंगमेहनत, निर्व्यसनी व कष्टाळू जीवन आनंदाने जगत जर आपण मुलांना योग्य ते शिक्षण दिले तर खरोखर साईनाथ सदैव आपल्या पाठीशी असेल आणि हीच खरी त्या ६५ वर्षीय महान शक्तिला वाहिलेली आदरांजली ठरेल.

# श्री साईशक

—श्री. संतोष ठाकूर
४।६५ जयविजय सोसायटी,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०९९.

० आजपर्यंत शालीवाहन, विक्रम, हिजरी असे अनेक शक त्या त्या राजांनी किंवा धर्मप्रमुखांनी आपल्या नावाच्या चिरंतन स्मरणार्थ प्रस्थापित केले होते व सवयीने त्यांचा वापर आपण नित्याच्या व्यवहारात विनासायास करू लागलो. त्याप्रमाणेच माझे वंदनीय दादा (श्री. दत्तात्रय भास्कर भागवत, पुणे) हे परम साईभक्त आहेत, तसेच श्री साईनाथांना त्यांनी सद्गुरु मानले आहे. त्या सद्गुरुंच्या चिरंतन स्मरणार्थ त्यांनी 'श्री साईशक' गेल्या वर्षापासून सुरु केलेला आहे. त्याचा थोडक्यात तपशील पुढीलप्रमाणे आहे.

जगत्कल्याण हे श्री साईनाथांचे आद्य ध्येय होते. वंदनीय दादांनी तेच गुरुकार्य मानून त्याचे प्रतिक म्हणून 'श्री साईशक' ही अभिनव भेट गेल्या विजया दशमीस (म्हणजेच शके १९०४ रोजी) त्यांचे सद्गुरु श्री साईनाथ महाराज यांना अर्पण केलेली आहे. त्यांनी आम्हां भक्तांना यापुढे कोणताही मजकूर लिहितांना प्रथम दिनांक लिहिण्यापूर्वी 'श्री साईशक' लिहिण्यास सांगितले असून आम्ही (सेवक-भक्त) ही आज्ञा शिरसावंद्य मानून तिचे पालन सदैव करीत आहोत.

जगतामध्ये मानवी धर्माचा उदय होऊन मानवी जीवन ईश्वरमय व्हावे हाच उद्देश श्रीसाईनाथ महाराजांच्या अवतार कार्यामागे होता व 'श्री साईशक' चा अवलंब केल्याने सद्गुरु श्री साईनाथ महाराज यांच्या अवतार कार्याच्या उद्दिष्टाची जाणिव प्रत्येक साई भक्ताचे ठायी अत्यंत सहजपणे व प्रकर्षाने रहाणार आहे.

परम पूज्य श्री साईनाथ यांच्या महानिर्वाणास येत्या विजया दशमीस ६५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्त सर्व साईभक्तांनी या विजया दशमीपासून नित्य व्यवहार करताना प्रथम 'श्री साईशक–२' लिहिण्यास सुरुवात करावी.

जेणेकरून संतचूडामणि भगवान श्री साईनाथ यांचे पुण्य स्मरण चिरंतन होत राहिल.

'श्री साईशक' अमृत भेट ।
नि प्रेमळ भक्ति साईनाथ ।।
बहुत जन्मिचा तव सहवास ।
मग विसर केवि हो साईनाथ ।।
हृत्कमलि मम तुझेच आसन ।
तुझेचि दर्शन साईनाथ ।।
'श्री साईशक' कार्य स्मरण तव ।
तेच समर्पण साईनाथ ।।

+++

# साई अभंग

साई तुझ्या दरबारी । विवंचना परिहारी ।।धृ.।।

दुःख जाते माघारी । सोडोनी मना ।
निर्मळ होई मन । घेता तुझे दर्शन
पापाचे निवारण । होई सत्वरी ।।१।।

संसाराचे सुख । वासनेची भुख ।
पाहता तुझे मुख । जाई विसरोनी ।।२।।

जन्मा येवोनिया । यावे शिर्डी जावोनिया
साईरूप साठवोनिया । ठेवावे उदरी ।।३।।

ऐसी तुझी किर्ती । मना येई स्फूर्ति
गातो तुझी आरती । भक्ति भावे ।।४।।

–श्री. सुरेश ज. रामवरणे
५।१ मिठाई चाळ, वाईशेत पाडा
कुरार व्हिलेज, मालाड (पूर्व),
मुंबई – ६४.

॥ श्रीसाईनाथ ॥

# महानिर्वाणा लोटली वर्षे पासष्ट




–श्री. मधुसूदन अंबाडे,
अंबाडे हाऊस, लकडी
पुलासमोर, बडोदा.


महानिर्वाणा जरी लोटली वर्षे आज ही पासष्ट ।
वचन पाळूनी, भक्ता रक्षुनि साई करितो संतुष्ट ॥
भक्तगणांचा भार वाहतो सद्‌गुरु साई भगवंत ।
संतचुडामणि साई अमुचा संतांचा संत ॥१॥

रक्षिले होते तात्यासी तू वचनबद्ध रे होऊनी ।
निज अंगी तो असाध्य ऐसा रोग घेतला ओढूनी ॥
निक्षूनी वदला होता एका दीन दुखींचा भगवंत ।
'जाणा हेचि तुम्हीहो सत्य, नित्य असे मी जीवंत ॥२॥

साई नामाची ही गोडी, ध्यावी तितुकी ती थोडी ।
आत्म स्वरूपी मन जोडी हो, माया बंधन ते तोडी ॥
ब्रम्हा, विष्णू, महेश्वरा नि तूच साई दिगंबरा ।
भक्तांसी ना जगी थारा हो एक साईचा सहारा ॥३॥

अंधचि होती नर–नारी त्या संदेहाच्या अंधारी ।
ज्ञानदिप लावूनि साई हा श्रद्धा निर्मितो भीतरी ॥
तोचि आत्मा पावन झाला, तत्वी तुझिया जो रमला ।
बाबासाई सांगुनि गेला, 'दुखवू नका तुम्ही कोणाला ॥४॥

विजया दशमी दिन आला तो एकोणिसशे अठराला ।
आनंदि आनंद जाहला, दसऱ्याचा तो सण आला ॥
शिरडी ग्रामी पुष्प तोरणे घराघरावरी लावीले ।
अंगणी शैशव मोद लुटूनी नाच नाचूनी ते रमले ॥५॥

इकडे मशिदीमध्ये साई अंथरुणावरी आजारी ।
गोर गरीबांचा हा वाली कुणी न जाई माघारी ॥
शिरडी जनांचा एकच ईश्वर साईबाबा हा संत ।
दयावंत हा धाऊनी रक्षी गरीब असो वा श्रीमंत ॥६॥

बाईलक्ष्मी नित्य पूजिती नवविधा तुज भक्तीत ।
म्हणूनी दिधले होते त्यांच्या नऊ रुपये तू हातात ॥
शेवटचे ते आशिर्वचन, शेवटचे ते होते दान ।
शेवटच्या त्या होत्या घटका, कुडीत होता जरीही प्राण ॥७॥

रोग घेतले साईने ह्या अनेक भक्तांचे अंगी ।
दया घनांचा सागर साई चमत्कारीक तू योगी ॥
साई शरीरी ताप वाढला, क्षीण झाली ती काया ।
धावाधावी झाली तरीही गेली सारी ती वाया ॥८॥

एकेकासी जेवण घेण्या साईने त्या पाठविले.
अन्न नि पाणी कायमचे परि बाबांनी हो सोडीले ॥
परमार्थ कर्णाचा अवतार, लाखोंचा हा तारणहार ।
नीराधार एक आधार, क्षणात आता अंतरणार ॥९॥

तात्यांच्या पहा कानामध्ये बाबा पुटपुटले आता ।
'श्वास रोकला, जातो आता व्यक्ता करूनी अव्यक्ता' ॥
बाबांच्या त्या मुखकमलातूनी शेवटचे ते हे शब्द ।
ऐकताच हो हरपली साऱ्या शिरडी जनांची ती शुद्ध ॥१०॥

दुःखावेग हे व्याकूळ भक्त साई साई करिती पुकार ।
मृत्युमुखी हा साई आता सोडूनी सकळासी जाणार ॥
अशक्त झाले बाबा आता पडूनी रहाती मशिदीला ।
सूर्यदेवही ढगाआड झाला पाहू न शकला साईला ॥११॥

महा प्रयत्ने पाणी आता भक्तांनी ते पाजिले ।
पिऊ न शकले बाबा त्यासी, गालावरूनी ओघळले ॥
डोळ्यामध्ये अश्रू दाटले, साऱ्यांचे हो गळे दाटले ।
देह सोडूनी आत्मा गेला, सर्वांनी ते ओळखले ॥१२॥

अति दुःखाचा वेग आज हा काही केल्या आवरेना ।
शोकसागरी शिरडी बुडाली कुणी न करण्या शांतवना ।।
बारा सोही स्थिरावला हो प्रकाश शिरडीचा गेला ।
अश्रूंनी जणू न्हाऊनी आल्या ढसढसा बाया त्या रडल्या ।।१३।।

दुःखावेगाने काही भक्त झाले होते बेशुद्ध ।
पाणी टाकूनी डोई वरती आणिली त्यांची ती शुद्ध ।।
शिरडीमध्ये दाही दिशेला छाया पसरली दुःखाची ।
मध्यरात्री सम अंधारली ती दुपार शांत शिरडीची ।।१४।।

अनेक होते निस्सिम भक्त हुंदका त्यांना आवरेना ।
कुणी कुणाचे शांतवन करणे हेच कुणाला सुचेना ।।
भरदुपारी मध्यांनी हो, माथ्यावरती तो रवी आला ।
साईरूपी हा सूर्यपरी, कायमचा हो मावळला ।।१५।।

थांबली सळसळ पानांची नी थांबली किलबिल पक्ष्यांची ।
भिकार–दुकार धावूनि आले मशिदीमध्ये सारेची ।।
मंगळवारी, मंगल दिनी दसरा मोहरम पाहोनी ।
साईचा तो आत्मा गेला, पार्थिव देहा सोडोनी ।।१६।।

कलीयुगी ह्या शिरडीक्षेत्री हिंदु, पारशी, मुसलमान ।
समदुःखी ते एकत्रिले, झाले आता महानिर्वाण ।।
दसरा येता हृदय दाटते भक्तांचे ह्या अजूनी पहा ।
पुकार करिता भावभक्तीने साई धावत येई हा ।।१७।।

ध्यानमग्न हा साई बसला शिरडीश्वरीच्या मंदिरी ।
भक्त रक्षितो आजही अपुला साईबाबा सत्वरी ।।
देऊ नको तू धन नी मान, मुखी राहू दे साई नाम ।
कोटी कोटी चरणी प्रणाम, एक वचनी साईनाम ।।१८।।

---

आयुर्दायस्नेह सरता । प्राणज्योति मंद होता ।
बयाजीचे अंकावरता । देह विश्रामता पावला ।।

x x x x

# साई साई

'साई साई' मंत्रोच्चारणे पावन जन होती,
तुझिया नामा परते अन्य न साधन या जगती ॥

दुःखी, कष्टी, दीनांचा तू एकची आधार
तुझ्याच प्रेमळ दृष्टीक्षेपे दुःखाचा विसर,
मशीद तुझी ही बनली द्वारकामाई,
राजा आणि रंक सर्वां ठाव तिच्या पायी ।

'विजया दशमी' या पावन दिवशी समाधिस्त होशी,
सकल जनांना दुःखसागरी लोटूनिया जाशी ।
शरीर तुझे हे घेई विसावा बुटी मंदिरात,
भक्तगणांची रीघ तिथे हो दिवस आणि रात ।

श्रद्धा-सबूरी शिकवण सोपी, नाही जात-पात
चराचरातच ईश्वर भरला देशी उपदेश ।
पासष्ट वर्षे उलटुनी गेली महाप्रयाणाला,
शिरडीक्षेत्री त्या पावन दिवशी जमे भक्त मेळा ।

संसाराच्या बंधनात या गुंतुनिया पडले
परि दृष्टीपुढूनी तरळुनी जाती सर्व तुझे सोहळे ।
कुठे असू दे भक्त तुझे, तू खेचुनिया नेशी
तुझ्याच पायी देई विसावा, मागणे अन्य नाही ॥

-सौ. विजया सुधीर करंडे.
६।१४८, ओ. एन. जी. सी. कॉलनी,
रूपनगर, वांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

# चिर यौवना समाधी

पासष्ट वर्षांची असे समाधी ।
परि दिसे चिर यौवना ।।
दर्शन घेती किती भक्तगण
परि तृप्त करीते सर्वांना ।।१।।

प्रातःकाळी स्नान घालिता ।
स्नानोदक ते होते अमृत ।।
मनोभावे करिता प्राशन ।
मुक्त करिते रुग्णांना ।।२।।

चादर तिजवर रेशमाची ।
किंवा असो ती फुलाफुलांची ।।
दृढ विश्वासे चरण वंदिता ।
पावते ती भक्तांना ।।३।।

श्रीसाईची किमया न्यारी
जादू भरली समाधी मंदिरी
श्रीसमाधीचे दर्शन घेता
बांधून घेती भक्तांना ।।४।।

—डॉ. सौ. मालती राहाटे
मु. पो. भंडारा, जि. भंडारा

**श्रीसाईलीला**
**१० वे लेखक-कवी संमेलन**
**विशेष माहिती दिवाळी अंकात वाचा**

# साई-भोळे साई-भोळे

भाव फुलांची माला ।
अर्पिते माझ्या साईला ।

देव्हाऱ्यात सुंदर साईमूर्ती ।
चित्ती असू दे ही त्रिमूर्ती ।
स्फूर्ती चढू दे साई भजनाला ।
भाव फुलांची माला ॥१॥

भक्तीचा तो धागा घेवूनी
प्रेमाची ती फुले वेचुनी ।
एकरूप मिळविन त्याला
भाव फुलांची माला ॥२॥

अज्ञानाची करूनी वात ।
ज्ञानाची ती उजळली ज्योत ।
प्रेम भरून मी पाहिन प्रभू साईला ।
भाव फुलांची माला ॥३॥

कमल म्हणे हो साईदेवा ।
सांभाळ माझा साई तू करावा
अव्हेरू नको तू या लेकराला ।
भाव फुलांची माला ॥४॥

–सौ. कमल रामदास इंगळे
गोपाल नगर, जोशी वाडी, नागपूर.

★

# साई भूपाळी

उठा, उठा हो साईनाथ, प्रभू!
उठी रे गोपाळा !
दर्शन घेण्या जमला सारा
भक्तांचा मेळा ! ॥धृ.॥

अज्ञानी आम्ही ही लेकरे,
तुझीच रे देवा !
चरणकमल हे तुझेच आता,
दाखवी जडजीवा
उठा, उठा – ॥२॥

तूच कर्ता आणि करविता,
साईनाथ देवा,
तुझ्या कृपेचा 'वरदहस्त' हा,
आम्हांवरी ठेवा!
उठा, उठा – ॥३॥

स्नानाची ही झाली तयारी,
गंध पुष्प–माला,
घेऊनी करी आरती,
भक्त जन उभा ठाकला !
उठा, उभा – ॥४॥

–श्री. दामोदर शिवराम माने
ब्लॉक नं. ए ९६१/१९२२
कैलास कॉलनी,
उल्हासनगर ५, जि. ठाणे.

# नांदी

(चाल : वनी करीतो शोक सीता)

लेडी बागेमध्ये साईबाबा
दर्शन आम्हां देणार का
विभूती हो, सदैव मिळता
मुक्ति मजला देणार का ॥धृ.॥

कुणास सांग, साईबाबा
बसून एकटे लेडी बागेमध्ये
लवकर येऊनी दर्शन देऊनी
दृष्टी माझ्या पडशील का ॥२॥

साक्षात तुमची अगाध कीर्ती
मनामध्ये अमुच्या दर्शन देशी
सदैव सेवा तुमची करावी
इच्छा अमुची पूर्ण करा ॥३॥

साईबाबा, गुपित येऊनी
दर्शन आम्हां देऊनी जाती
ज्ञानेशाच्या अंत करणी
शांति, सेवा लाभावी ॥४॥

—श्री. ज्ञानेश्वर रामचंद्र पाटील
द्वारा आर्. एल्. खानविलकर
घ. नं. ३७, नारळी आग्रीपाडा,
१८ वा रस्ता, खार मुं. नं. ५२

[illegible] सुहृदांना [illegible]

[illegible]

[illegible] साई [illegible] [illegible]

संपादक — विजय [illegible], [illegible]

# ❀ साई प्रसाद ❀

दिवाळी अंक ६ वर्षे

[illegible], [illegible] [illegible], [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] साई–साहित्य – [illegible], [illegible] ...... [illegible] [illegible] ...... [illegible] [illegible]

" [illegible] साईंची ओंजळीत " ...... [illegible] [illegible] साईभक्तांचे [illegible] [illegible] ......

संपर्क :— सौ. [illegible] विजय [illegible],
सी/६, [illegible], [illegible] [illegible] रोड,
बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६

अंक मिळण्याचे ठिकाण :— [illegible], [illegible] [illegible] ([illegible])
मे. [illegible] अँड कंपनी — [illegible] — [illegible]